जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# बनावट शासन आदेश दाखवून कामे करत बिले काढण्याचा प्रयत्न; श्रीगोंद्यातील ठेकेदारावरही फसवणुकीचा गुन्हा दाखल

नगर - बनावट शासन आदेश प्रकरणात नगरच्या कोतवाली, भिंगार कॅम्पनंतर बेलवंडी (ता.श्रीगोंदा) पोलिस ठाण्यातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग, श्रीगोंद्याचे स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सुरेश खेडकर यांनी फिर्याद दिली आसून, घुटेवाडी (ता.श्रीगोंदा) येथील किशोर घुटे व इतर लोकांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ऑक्टोबर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, बनावट शासन आदेश काढण्यात आला होता. यामध्ये श्रीगोंदा तालुक्यातील एकूण पाच कामे मंजूर होती. हा शासन निर्णय श्रीगोंदा तालुक्यातील घुटेवाडी येथील किशोर घुटे (रा. घुटेवाडी, ता. श्रीगोंदा) यांनी स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सुरेश खेडकर यांना देत कामांच्या जागेची पाहणी करून अंदाजपत्रके तयार करण्याची मागणी केली. त्यानुसार खेडकर यांनी संबंधित कामांच्या ठिकाणांची पूर्ण पाहणी करून आवश्यकतेनुसार अंदाजपत्रके तयार केली व त्यास विभागीय कार्यालयाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर विभागीय स्तरावर निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानंतर विभागीय कार्यालयाकडून कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले.

त्या अनुषंगाने एकूण ५ कामांपैकी ४ कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मानकानुसार व अंदाजपत्रकानुसार करून घेण्यात आले. तसेच केलेल्या ४ कामांची मोजमापे घेऊन देयके मोजमाप पुस्तकात नोंदवून विभागीय मंजूर कार्यालयात मंजुरीसाठी सादर करण्यात आली. त्यानंतर देयकांची छाननी करून निधी मागणीसाठी देयके ग्रामविकास विभागाकडे सादर करण्यात आली. तथापि हा शासन निर्णय बनावट असल्याचे बांधकाम विभाग अहिल्यानगर कार्यालयास कळविण्यात आले. त्यानंतर कोणत्याही प्रकारचे देयके अदा करण्यात आलेले नाही.

तसेच कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगर यांनी बनावट शासन निर्णय सादर करणाऱ्या संबंधिताविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्याबावत कळविले आहे. त्यानुसार खेडकर यांच्या तक्रारीवरून बेलवंडी पोलिसांनी किशोर घुटे व इतर यांनी संगनमताने बनावट कागदपत्रे बनवून देखील सदरची कागदपत्रे खरी असल्याचे भासवून शासनाची फसवणूक केली आहे, म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी बेलवंडी पोलिस पुढील तपास करत आहेत.

## प्रेरणादायी अक्षरधन...

### कर्म करत राहा...नामस्मरण चिंतन करत राहा



महाभारतात भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतोपदेश केला तद्वतच निवृत्तीनाथांनी लहान भाऊ ज्ञानेश्वरांना जीवनाचे सार सांगितले. तसाच म लाचा उपदेश पुनर्जन्म लाभलेल्या सदानंद अर्थात सच्चिदानंदाला माऊलींनी दिला आणि त्यांच्याकडून ज्ञानेश्वरी लिहून घेतली.

माऊली म्हणतात, ''सदानंद, संसार म्हटला की सुखदु:खाचं अविरत फिरणारं चक्र आलंच! या गोष्टी परमात्म्याची इच्छा म्हणून स्विकारायला हव्यात! माणसानं फक्त विहीत कर्म कराव.''

कर्माचं फळ मिळणं ईश्वरेच्छेवर अवलंबून आहे. त्याची आशा धरली तर आशेमागे निराशा येते. ती टाळता येत नाही, म्हणून निराशामागे वेदना येते! वेदनेमधून कामक्रोधादी षड्रिपू निर्माण होतात आणि ते अंत:करणाचा सर्व आनंद हिरावून घेतात. यासाठी मुळात फलाशाच सोडायला हवी.

। कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।।
। मा कर्मफलहेतु र्भूमाऽते संगोस्त्व कर्मणि ।।

गीतेतील हे तत्त्वज्ञान आचरणात आणणं प्रारंभी कठीण वाटतं, परंतु पुढे त्याची सवय होते. यातील सुरुवातीची अवघड अवस्था टाळण्यासाठी त्याला हरिनामाची जोड द्यावी. हरिनामाइतकं महान पुण्य नाही! पातकांच्या राशीच्या राशी या हरिनामान जळून जातात!

सर्वत्र एकच हरी भरुन राहिला आहे याचं ज्ञान, अनुभूती आपल्याला हरिनामानं खचितच होईल. आपण सदानंद आहातच, चित्ताला आनंद देणारं हरिनाम घ्या. आपण सच्चिदानंद व्हाल!''

यावर सदानंद म्हणाला, '' योगीराज; मी धन्य झालो माझ्या संसाराच्या दृष्टीनं मी मृतवत झालेलो होतो आणि हरिनामाचा (नामस्मरण) संजीवनी मंत्र देऊन मला पुन्हा जिवंत केलत! माझा आश्रम सार्थ झाला. माझे जीवन सार्थक बनले. तात्पर्य, योग्य गुरू वा ईश्वरीकृपा लाभून ईश्वरी चिंतन, मननात जीवन घालवण्याचा प्रामाणिक व निरंतर प्रयत्नातच सफलता आहे. जीवनाचे साफल्य आहे.

### कँटोन्मेंट बोर्डांचे विलीनीकरण मनपा निवडणुकीनंतरच होणार

मुंबई - छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अहिल्यानगरसह राज्यातील ६ कँटोनमेंट बोर्डाचे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर महापालिकेत विलीनीकरण करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले. त्यामुळे आता आगामी निवडणुका वेळेत होतील.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी कँटोनमेंट बोर्डाच्या (छावणी परिषद) मनपा किंवा नगर परिषदांत विलीनीकरणास तत्त्वतः मंजुरी मिळाली आहे. मनपा निवडणुका तोंडावर असल्याने याबाबत तातडीने निर्णय व्हावा, अशी मागणी केली होती. यावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, पुणे, खडकी, छत्रपती संभाजीनगर कैंटोनमेंट बोर्डाचे विलीनीकरण महापालिकेत होणार आहे. कामठीचे (नागपूर) नगरपालिकेत तर देवळालीला (नाशिक), भिंगार (अहिल्यानगर) येथे नगर परिषद होणार आहे. देहूरोड कँटोन्मेंट बोर्ड मात्र लष्करी संवेदनशीलतेमुळे सध्या तरी यातून वगळण्यात आले आहे. या निर्णयामुळे कँटोनमेंट भागातील नागरिकांना नागरी सुविधांचा लाभमिळणार असून, लोकशाही प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



शहरातील स्वच्छतागृहातील झालेली दुरावस्था व रस्त्यांवर साचलेले साचलेले कचऱ्याचे ढिग.

# केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षणात देशात ५ वा येण्याचा पुरस्कार अहिल्यानगर महानगरपालिकेने विकत आणला आहे काय ?

नगर - अहिल्यानगर शहर कचरामय झाल आहे. घंटागाड्या गायब आहेत. जागोजागी कचऱ्यांचे ढीग साचले असून घाणीचे साम्राज्य झाले आहे. दुर्गंधीमुळे नागरिकांचे जगणे मुश्किल झाले आहे. शहरामध्ये सार्वजनिक शौचालया अभावी नागरिकांची, विशेषत: माता भगिनींची कुचंबणा होत आहे. हाताच्या बोटावर मोजण्या इतकी असणारी शौचालयं शहरात असून ती देखील दारूच्या बाटल्या, मावा, गुटक्याच्या पिचकाऱ्या, होत नसलेली स्वच्छता यामुळे नागरिकांनी त्यांचा वापर करावा अशी स्थिती उरलेली नाही. तरी देखील अहिल्यानगर मनपा स्वच्छतेत देशात अव्वल येथे कशी ? हा चमत्कार कशामुळे साध्य होतो ? केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षणात देशात पाचवा येण्याचा पुरस्कार मनपाने विकत आणला आहे काय ? असा सवाल ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे.

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मिशन २०२४ अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षणात ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांच्या गटात अहिल्यानगरचा देशात पाचवा तर राज्यात चौथा क्रमांक आला आहे. जलस्त्रोत, निवासी व मार्केट परिसर आणि शौचालयांची स्वच्छता यामध्ये केलेल्या कामगिरीबद्दल अहिल्यानगर महानगरपालिकेला अव्वल गुणांकन देण्यात आला आहे. भारत सरकारने वॉटर प्लस आणि कचरामुक्त शहराचे थ्री स्टार मानांकन मनपाला दिले आहे. या पार्श्वभूमीवर शहर शिवसेनेने शहरातील कचरा आणि सार्वजनिक शौचालयांची वस्तुस्थिती दाखवणारी पाहणी करत पोलखोल केली आहे.

रेसिडेन्सीअल हायस्कूल समोर असणाऱ्या मनपाच्या शौचालयाची दुरावस्थेची किरण फळे यांनी पदाधिकाऱ्यां समवेत पाहणी केली. काळे म्हणाले, नगरकरांनीच आता हे पहावं. शहरात मोजक्याच असणाऱ्या शौचालयांपैकी या शौचालयात गुटखा, मावा यांच्या पिचकाऱ्या, दारूच्या बाटल्या यांचा खच पडला आहे. स्वच्छताच होत नसल्यामुळे प्रचंड दुर्गंधी सुटली आहे. नागरिकांनी कसा यांचा वापर करायचा, अशी वस्तुस्थिती असताना शौचालयांची स्वच्छता यामध्ये केलेल्या कामगिरीबद्दल अहिल्यानगर महापालिकेला अव्वल गुणांकन कसे काय मिळते ? असा सवाल काळे यांनी केला आहे.

### नगरकरांना शरम वाटेल अशी कामगिरी

देशात पाचवा, राज्यात चौथा क्रमांक मिळावा अशी कोणतीही भूषावह कामगिरी मनपाने केलेली नाही. उलट नगरकरांची मान शरमेने खाली जाईल असा मनपाचा कारभार आहे. स्वच्छ सर्वेक्षण तपासणी करणारी सरकारची टीम ज्यावेळी अहिल्यानगर मध्ये आली होती त्यावेळी मनपाला अव्वल गुणांकन आणि वरच्या क्रमांकाचे पारितोषिक मिळावे यासाठी मनपा अधिकाऱ्यांनी त्यांना किती लक्ष्मी दर्शन दिले ? अशी पाकीट देण्या ऐवजी प्रत्यक्ष काम करा. शहर स्वच्छ करा. खऱ्या अर्थाने कचरामुक्त करा. अन्यथा आम्हाला शिवसेना स्टाईल रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा देत शहरातील सार्वजनिक शौचालयांची संख्या वाढवण्याची मागणी किरण काळे यांनी केली आहे.

# मुकुंदनगरमध्ये तरुणाच्या खुनाचा प्रयत्न

नगर - मोहरम मिरवणुकीच्या दिवशी गर्दीत मित्राकडून हरवलेल्या घड्याळाचा राग मनात धरून दोघांनी त्याच्या डोक्यात फरशीच्या तुकड्याने आणि कोणत्यातरी धारदार हत्याराने, खांद्यावर, मानेवर, पाठीवर, हातापायावर वार करुन खुनाचा प्रयत्न केल्याची घटना मुकुंदनगर येथील आर आर बेकरीजवळ १७ जुलै रात्री ८ ते १२.३० वाजेच्या दरम्यान घडली.

याबाबत अल्तमश नासिर पठाण (वय २८, रा. आर आर बेकरीजवळ, मुकुंद नगर) याने भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. फिर्यादी याचेकडून मित्र फिरोज मोमीन याचे हातात घालायचे घड्याळ मोहरम मिरवणुकीच्या दिवशी गर्दीत हरवले होते. त्याचा मनात राग धरुन फिरोज मोमीन व साजिद शेख यांनी धारदार हत्यार व फरशीच्या तुकड्याने फिर्यादीच्या डोक्यात, तोंडावर, खांद्यावर व हातावर वार करून त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला.

त्याला वाचवायला आलेल्या अमिर शेखला ही मारहाण केली. घड्याळ नाही दिलं तर जीव घेईन,अशी धमकीही दिली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अल्तमस पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोघांविरुद्ध खुनाचा प्रयत्न आणि इतर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे करीत आहेत.

# रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या दोघांना पकडले

नगर - रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन तोंडाला रुमाल बांधून संशयित्या फिरणाऱ्या दोघांना नगर तालुका पोलिसांनी पकडले. ही कारवाई नगर तालुक्यातील बारादरी फाट्याजवळ, मारुती मंदिराच्या मागे बारादरी शिवारात आणि नगर पुणे रोडवरील चास ते निमगाव वाघा रोडवर अडसूळ कॉलेज जवळ १७ जुलै रोजी रात्री करण्यात आली आहे.

नगर तालुका पोलीस हे नगर तालुका हद्दीत रात्र गस्त घालत असताना बारादरी शिवारात बारादरी फाट्याजवळ मारुती मंदिराच्या मागे आडोशाला अंधारात संशयितरित्या फिरणाऱ्या सतीश गीताराम शिंदे (वय ३२, रा.सडे, तालुका राहुरी जि. अ.नगर) यास पकडले. तर दुसऱ्या कारवाईत नगर पुणे रोडवरील चास ते निमगाव वाघा रोडवर अडसूळ कॉलेज जवळ अंधारात काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयितरित्या हालचाल करणाऱ्या राम नरेश सदाय (वय २७, रा. मधुबन्नी, बिहार) यास पकडण्यात आले.

याप्रकरणी दोघांवर नगर तालुका पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## केबल अडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू

(पान १ वरुन)

एका कंपनीत कामाला होता. मयत बांगर व त्याचा मावसभाऊ शुभम बाबासाहेब घुले (वय १८, रा. कारखेल, ता. आष्टी, जि.बीड) हे दोघे जण शुभम याच्या हिरो कंपनीच्या स्प्लेंडर मोटारसायकल वर (क्र.एम एच २३ बी पी ०६९७) १४ जुलै रोजी नगरमध्ये आले होते. शुभम याला मोटारसायकलची सर्व्हिसिंग करायची असल्याने सावेडीतील साईदीप शोरुम येथे त्याला सोडून ज्ञानेश्वर हा दुपारी १ वाजता एमआयडीसी येथील एक्साईड कंपनीत कामाला निघून गेला होता. शुभम हा सायंकाळी ५.३० पर्यंत शोरूमला थांबला. त्या नंतर तो ही एमआयडीसी येथे ज्ञानेश्वरच्या कंपनीत गेला. तेथे रात्री ११ वाजता ज्ञानेश्वरची सुट्टी झाल्यावर दोघेही कंपनीतून मोटारसायकलवर गावाकडे जाण्यासाठी निघाले.

मोटारसायकल ज्ञानेश्वर चालवत होता व शुभम पाठीमागे बसलेला होता. मनमाड रोडने नगर कडे येत असताना सावेडी परिसरातील कीर्ती हॉटेल जवळ रस्त्याच्या वरून जाणारी काळी केबल तुटून खाली लोंबकळत होती. अंधारामुळे त्यांना ती दिसली नाही, सदर केबल ज्ञानेश्वर च्या गळ्यात अडल्याने त्याची मोटारसायकल घसरून दोघेही खाली पडले. त्यावेळी ज्ञानेश्वरचे डोके दुभाजकात असलेल्या पथदिव्याच्या लोखंडी खांबाला आदळल्याने तो गंभीर जखमी झाला.तर शुभमही जखमी झाला. त्यावेळी परिसरातील नागरिकांनी या दोघांना जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र ज्ञानेश्वरची प्रकृती चिंताजनक असल्याने नातेवाईकांनी त्याला पुढील उपचारासाठी खाजगी रुग्णालयात हलविले. तेथे उपचार सुरु असताना १५ जुलै रोजी रात्री १.१२ वाजण्याच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला आहे. याबाबतची फिर्याद १८ जुलै रोजी दुपारी शुभम घुले याने तोफखाना पोलिस ठाण्यात दिली असून त्यावरून पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे. मयत ज्ञानेश्वर याच्या पश्चात आई, वडील, ३ बहिणी असा परिवार आहे. ज्ञानेश्वर हा घरातील एकमेव कर्ता पुरुष होता. तोच अपघातात गेल्याने त्याचे कुटुंबीयांवर हा मोठा आघात झाला आहे.

# महापालिकेच्यावतीने आगरकर मळा परिसरात डेंगू मुक्त अभियान

**नगरकरांनी मनपाच्या आरोग्य केंद्रावर जाऊन मोफत रक्त लघवी तपासणी करून घ्यावी : आयुक्त यशवंत डांगे**

नगर - शहरातील नागरिकांचे आरोग्य निरोगी रहावे यासाठी तसेच डेंग्यू व पावसाळ्यात उद्भवणारे विषाणूजन्य आजार रोखण्यासाठी महापालिका आरोग्य विभागामार्फत मागील वर्षापासून डेंग्यूमुक्ती अभियान सुरू करण्यात आले आहे. शहरात दीड लाख लोक वस्ती असून मनपा कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे त्यामुळे प्रत्येकाच्या घरी जाणे शक्य नाही तरी नागरिकांनी आठवड्यातून एक तास स्वच्छता मोहीम राबवावी, शहरामध्ये वीस आठवडे डेंगू मुक्त अभियान सुरू राहणार असून आज पर्यंत ६ आठवडे झाले आहे. यामध्ये ३५० घरामधील पाणीसाठ्यामध्ये डेंग्यू सदृश्य अळ्या सापडल्या असून ५५० पाणीसाठे नष्ट केले आहे. महापालिका आरोग्य विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांनी आतापर्यंत ७ हजार घरांना भेट देत नागरिकांची तपासणी करून औषध उपचार केले आहे. तरी नगरकरांनी महापालिकेच्या आरोग्य केंद्रावर जाऊन मोफत रक्त लघवी तपासणी करून घ्यावी डेंग्यू हा आजार कमी रोग प्रतिकारशक्ती कमी असलेल्या व्यक्तीला होवू शकतो, हा आजार दिसतो तसा नसून जीव घेणारा आहे, सर्व नगरकरांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.



महापालिकेच्यावतीने आगरकर मळा परिसरामध्ये डेंगू मुक्त अभियान राबविण्यात आले. (छाया - लहू दळवी)

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आगरकर मळा परिसरामध्ये डेंगू मुक्त अभियान राबविले जात आहे. त्यानुसार २० जुलै रोजी स्टेशन रोड भागातील आगरकर मळा परिसरात झाले.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे, माजी नगराध्यक्ष अभय आगरकर, माजी उपमहापौर गीतांजली काळे, माजी नगरसेवक दीपक खैरे, विजय गव्हाळे, प्रशांत गायकवाड, शीला शिंदे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष के डी खानदेशे, आरोग्य अधिकारी सतीश राजुरकर, सृष्टी बनसोडे, सुरेखा विधाते, बूथ हॉस्पिटल प्रशासन अधिकारी मेजर उषा गायकवाड, डॉ. सृष्टी बनसोडे, विकास गीते आदी उपस्थित होते

यावेळी महापालिकेच्या महात्मा फुले आरोग्य केंद्राच्या वतीने आशा सेविकांच्या माध्यमातून डेंग्यूमुक्ती जनजागृती करीता डेंग्यू चा हल्ला व त्यावर मात या विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले. बुथ हॉस्पिटलच्या विद्यार्थ्यांनी घोषवाक्य असलेल्या फलकांद्वारे जनजागृती केली.

महापालिका हद्दीमध्ये २० आठवडे मुक्ती अभियान राबविण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यापैकी सहा आठवडे पूर्ण झाले आहेत. डेंग्यूची अथवा तत्सम आजारपणाची लक्षणे जाणवताच नागरिकांनी तात्काळ डॉक्टरांच्या सल्ल्याने औषध उपचार घ्यावा. प्रत्येकाने आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत राहण्याच्या दृष्टीने संतुलित आहार घ्यावा असे आवाहन यावेळी आयुक्त डांगे यांनी केले.

## कांतीलाल बाफना यांचे हृदयविकाराने निधन



नगर - सावेडी येथील गावडे मळ्यातील रहिवासी कांतीलाल पृथ्वीराज बाफना (वय ७७) यांचे १९ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, नातू, जावई असा परिवार आहे. किरण बाफना यांचे ते वडील होत.

# वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या शहरातील हातगाडी चालकांवर कारवाई

नगर - तोफखाना पोलीस ठाणे हद्दीतील नगर कल्याण रोडवर आणि बालिकाश्रम रोडवर वाहतूकीस अडथळा निर्माण करणाऱ्या ११ हातगाडी चालकांवर तोफखाना पोलिसांनी कारवाई करीत गुन्हे दाखल केले आहेत. ही कारवाई १८ जुलै रोजी करण्यात आली.

तोफखाना पोलीस पेट्रोलिंग करीत असताना नगर कल्याण रोडवर वडापाव, नाष्टा, चहाच्या एकूण पाच हातगाड्या रस्त्याच्या मधोमध उभ्या केलेल्या आढळून आल्या. त्यामुळे अपघाताची शक्यता निर्माण झाली होती. पोलिसांनी संबंधित गाडी चालक विक्रम भाऊराव गायकवाड (वय ४८, रा. सिद्धार्थनगर, बौद्धवस्ती, अ.नगर) महादेव कान्हू बारस्कर (वय ३६ रा. सावेडी बाफना ज्वेलर्स समोर, अ.नगर), विठ्ठल निवृत्ती बारस्कर (वय ४९,रा. सावेडी,अ.नगर), नेहरु लाल उदलाल अहिर (वय ३२,रा. आंबेडकर भवन समोर, सावेडी), किसन घाशीराम तोमर (वय २५, रा. शिंदे मळा, बालिकाश्रम रोड) यांच्या हातगाडीचा पंचनामा करुन कायदेशीर कारवाई केली.

दुसऱ्या कारवाईत दुसऱ्या कारवाईत बालिकाश्रम रोडवर रस्त्याच्या मधोमध उभे असलेल्या फुलाची गाडी, फळगाडी व भाजीपाल्याच्या गाड्या अशा एकूण सहा हातगाड्या मिळून आल्याने पोलिसांनी हातगाडी चालक उमेश काशिनाथ पानमळकर (वय ४०, रा. पानमळकर मळा, नागरदेवळे), अनिल निवृत्ती कार्ले (वय ५५,रा. गोरखनाथ मंदिराजवळ बोल्हेगाव), राजू गोवर्धन चौरे (वय ५३,रा. बालिकाश्रम रोड शाळेजवळ अ. नगर), ज्योती किरण चव्हाण (वय ४०, रा. बोल्हेगाव गावठाण अ.नगर), प्रशांत भाऊसाहेब केळकेंद्रे (वय ३५, रा.भुतकरवाडी, महेश कॉलनी, अ.नगर), प्रवीण काशिनाथ भाकरे (वय २०, रा. प्रेमदान हडको, सावेडी) यांच्या हातगाडीचा पंचनामा करुन कारवाई केली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात ११ गुन्ह्यांची नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार जे. एन. आव्हाड हे करीत आहेत.

## मावा बनवणाऱ्या कारखान्यावर छापा; ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल केला जप्त

नगर - राज्यात प्रतिबंधित असलेले सुपारी व सुगंधी तंबाखू मिश्रित मावा बनवून विक्री करणाऱ्या कारखान्यावर पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाने छापा टाकला. या कारवाईत दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ८६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाने नगर तालुक्यातील नागरदेवळे येथील नागेश्वर चौकातील घरात सुरु असलेल्या मावा बनवण्याच्या कारखान्यावर छापा टाकला. या कारवाईत ८० हजार रुपये किमतीची मावा बनवण्याची इलेक्ट्रिक मशीन व ६ हजार रुपये किमतीचा तयार मावा असा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत गजेंद्र संजय ताजणे (वय ३५, रा. नागरदेवळे, ता. नगर) आणि आदित्य पांडुरंग दळवी (वय २५, रा. माळगल्ली, भिंगार )यांना ताब्यात घेतले.

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल विजय ढाकणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोघांविरुद्ध बी एन एस चे कलम १२३, २२३, २७४, २७५, ३ (५)प्रमाणे गुन्ह्यांची नोंद केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निसार शेख हे करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### प्या जायफळाचा चहा

एकीकडे मान्सून ऋतू थंडावा, हिरवळ आणि रिमझिम पाऊस घेऊन येतो, तर दुसरीकडे तो सर्दी, घसा खवखवणे, थकवा आणि वारंवार होणाऱ्या विषाणूजन्य आजारांचे कारण बनतो. अशा शरीराच्या अंतर्गत रोगप्रतिकारक शक्तीने स्वतःला बळकट करणे महत्वाचे आहे. रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या आहारात आले, तुळस पावसाळ्यात शरीराचे संक्रमण होण्यापासून संरक्षण करण्यासाठी फायदेशीर आहे. जायफळमध्ये आढळणारे सक्रिय संयुगे शरीराची बॅक्टेरिया आणि विषाणूंशी लढण्याची क्षमता मजबूत करतात. हे विशेषतः घसा खवखवणे, बंद नाक आणि शिंका येणे कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. जायफळ श्लेष्मा सैल करते आणि श्वसनमार्ग साफ करण्यास मदत करते, ज्यामुळे खोकला आणि सर्दीपासून त्वरित आराम मिळतो. जायफळाचा चहा प्यायल्याने शरीराला आराम मिळतो आणि चांगली झोप येते, ज्यामुळे लवकर बरे होता येते.

## पाककला

### लसुनी पालक

**साहित्य :** १ जुडी पालक, १/४ वाटी तूर डाळ, १ मूठ शेंगदाणे, १० ते बारा लसणाच्या कळ्या, २ ते तीन लाल मिरच्या, ४ हिरव्या मिरच्या, १ चमचा किसलेलं खोबरं, १ कांदा, १ टोमॅटो, फोडणीसाठी जीरे, मोहरी, हिंग, कढीपत्ता

**कृती :** पालक स्वच्छ धुऊन चिरून घ्या कुकरमध्ये एक मूठ शेंगदाणा डाळ पालक एकत्र शिजवून घ्या दोन ते तीन शिट्ट्या करा हिरवी मिरची आणि खोबऱ्याचं वाटण करून घ्या. कुकर थंड झाल्यानंतर पालक डाळ एकत्र घोटून घ्या पातेल्यामध्ये तेल घाला. यामध्ये जीरे, मोहरी, हिंग, कढीपत्त्याची फोडणी घाला. कांदा टोमॅटो वाट परतून घ्या. वाटलेले मिरचीचे मिश्रण मिक्स करा आणि शिजवलेला पालक यामध्ये ओता आणि दोन मिनिटं शिजू द्या यामध्ये एक चमचा बेसन घाला दोन ते तीन चमचे शेंगदाण्याचा कूट घाला आणि या मिश्रणाला उकळी येऊ द्या. फोडणीच्या भांड्यामध्ये तेल घाला यामध्ये जीरे, हिंग घाला. लसूण ठेचून घाला आणि लाल मिरची घालून याचा तडका बनवा आणि पालकच्या भाजीवर ओता भाजीला छान उकळी येऊ द्या. भाकरी किंवा चपाती बरोबर लसूनी पालक सर्व्ह करा.

## वास्तू

❋ मुलांची बेडरूम आदर्शपणे तुमच्या घराच्या पश्चिम दिशेला असावी. वास्तू सुचवते की तुमच्या मुलाने आरामशीर आणि शांत झोपेसाठी पूर्व किंवा दक्षिण दिशेला डोके ठेवून झोपावे. नैऋत्य दिशेला लहान मुलांच्या शयनकक्षाचे स्थान देखील वास्तूनुसार भाग्यवान मानले जाते.

❋ तुमच्या मुलाच्या खोलीचे दार पूर्वाभिमुख असावे जेणेकरून सकारात्मक आणि आनंदी वातावरण निर्माण होईल. ते घड्याळाच्या दिशेने उघडले पाहिजे. वास्तूनुसार, तुम्ही दारावर फलक किंवा चिन्हे टांगू नये कारण ते आक्रमकता किंवा अहंकाराच्या संघर्षासारखी नकारात्मक ऊर्जा निर्माण करतात.

## सल्ला

❋ कापून ठेवलेला कांदा दुसऱ्या दिवशी खाल्ल्यास पोटाचे इन्फेक्शन होऊ शकते.

❋ रोज दही खात असल्यास युरिन इन्फेक्शन होत नाही.

❋ मसालेभात, पुलाव करताना तांदूळ २-३ तास भिजवून ठेवावा वेगळीच चव येते.

## सौंदर्य

चेहऱ्यावर चमक आणि ग्लो येण्यासाठी १० बदाम रात्रभर भिजत ठेवा सकाळी त्याची साल काढून पेस्ट बनवा आता या बदामाचा पेस्टमध्ये १ टीस्पून ओट्स १ टीस्पून मध आणि थोडेसे दही घालून चांगले मिक्स करा आता ही पेस्ट चेहऱ्यावर लावा आणि अर्ध्या तासानंतर चेहरा पाण्याने स्वच्छ धुवावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २० जुलै २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, कृतिका २२।५३, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** दैनंदिन कामापासून विश्रांतील मिळेल. कुटुंबियांसमवेत दिवस आनंदात जाईल.

**वृषभ :** स्वत:च्या क्षमतांचा चांगला वापर कराल. मालमत्ताविषयक कामे होतील आणि उत्तमपैकी नफा होईल.

**मिथुन :** आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल.

**कर्क :** तुमच्या हातातून पैसे हरवतील. कुंटुंबातील सदस्यांच्या गरजांवर लक्ष केंद्रीत करुन त्या पूर्ण कराल.

**सिंह :** आपल्या आत्मविश्वासाला अपेक्षांची जोड मिळाल्यामुळे आपली स्वप्ने प्रत्यक्षात येतील.

**कन्या :** आर्थिक आघाडीवरील सुधारणा महत्त्वाच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील.

**तूळ :** एका कठीण काळानंतर आजच्या दिवशी तुम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का बसेल.

**वृश्चिक :** मागील उधारी उसनवारी वसुल होईल. भाऊबंद डोके वर काढतील. दिवस बोरिंग वाटेल.

**धनु :** आशावादी रहाल. कामे वेळेवर होतील. मात्र कष्टही करावेच लागतील.


**मकर :** आज तुमच्याजवळील उत्तम संकल्पना आणि तुम्ही केलेल्या कृती यामुळे तुम्हाला अपनेक्षीत फायदा होईल.

**कुंभ :** आजच्या दिवशी जुन्या मित्रांबरोबर बालपणीच्या आठवणींमध्ये रमाल.

**मीन :** चिंता सोडून द्याल आणि आपल्या रोमॅण्टीक जोडीदाराच्या सहवासाचा आनंद घ्याल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२२४ सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७२२३ चे उत्तर**



**आडवे शब्द :-** २) हनुमान; मारुती ६) ऐट; नखरा; गर्व ८) शिजलेला तांदूळ ९) फळातील रसाळ भाग; गर १०) सावट; सावली ११) कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात १२) परिस्थितीची अनुकूलता; संधी १४) पेढे, बर्फी वगैरे पदार्थ १७) पाठीमागे १८) कळणे; जाणणे; धरणे; स्वाधीन ठेवणे २०) आधारभूत वाक्य; भाषण; प्रतिज्ञा २२) पोस्ट; टपाल; मेल २३) जिव्हा; जीभ; किराणा दुकानदार २४) कानन; कांतार; जंगल; अरण्य; रान २५) लंबकर्ण; गर्दभ; गाढव; रासभ

**उभे शब्द :-** १) येणे २) उद्योगक्षेत्रातील एक नावाजलेले आडनाव ३) एक अप्सरा ४) गेलेला; भूत; अवस्था; दशा ५) अगदी सहज; हसतखेळत ७) न सुटणारी अशी घट्ट मिठी १०) सुंदर; रम्य; सुबक १२) मोठ्या बहिणीचे संबोधन १३) नवरा; पती; स्वामी; यजमान १५) ठासलेले १६) बागकाम करणारा; बागवान; माळी; फुलधर १७) एक पक्षी; जंगली कबूतर १८) तोंड; वदन १९) एक केंद्रशासित प्रदेश २१) रस; स्वाद; गोडी

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : नशिबावर भरोसा ठेवून राहणे म्हणजे केवळ भेकडपणा आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### औषध विक्रेत्याकडून तक्रारी सांगून औषधे घ्यावीत का?

एकदा एक गंमतशीर घटना बघायला मिळाली. औषधे घ्यायला एका दुकानात गेलो होतो. तेवढ्यात एक गृहस्थ दुकानात आले व तावातावाने दुकानदाराशी भांडू लागले. ''मी तुम्हाला संडास थांबण्यासाठी औषध मागितले होते ना?''

दुकानदार म्हणाला, ''अहो, मला वाटलं संडास होण्यासाठी औषध पाहिजे आहे!''

हा झाला एक साधा किस्सा. याहून गंभीर व प्राणघातक ठरलेल्या घटनाही सांगता येतील. औषध व विष यात फक्त देणाऱ्याच्या उद्देशाचा फरक आहे, असे म्हटले जाते. यावरून चुकीमुळे घेतलेल्या औषधांच्या परिणामाची कल्पना यावी. एकाचे औषध हे दुसऱ्यांसाठी विष ठरू शकते. डोकेदुखीसाठी उपयुक्त असे ॲस्पीरिन जठराचा व्रण असलेल्या व्यक्तीसाठी हानिकारक ठरू शकते. सल्फरच्या गोळ्यांनी एखाद्या व्यक्तीच्या सर्वांगावर पुरळ येऊ शकते. काही औषधांमुळे ॲलर्जी होऊ शकते.

औषध विक्रेते फार्मसी अर्थात औषध निर्मिती शास्त्रातील पदविका वा पदवीधारक असायला हव्यात; पण बऱ्याचदा औषधे देण्याचे काम प्रशिक्षण न झालेल्या व्यक्तीच करतात. त्यामुळे त्यांना औषधांची माहिती नसते. तसेच औषधी निर्मितीतला पदवीधर देखील डॉक्टर नसतो व त्यामुळे त्याला रुग्णावर उपचार करण्याचा कायदेशीर अधिकार तर नसतोच, पण तेवढे ज्ञानही नसते. त्यामुळे वर उल्लेखल्याप्रमाणे किस्से घडतात.

कधीकधी प्राणहानीही होऊ शकते. त्यामुळे औषध विक्रेत्याकडून डॉक्टरी सल्ल्याखेरीज व मार्गदर्शनाखेरीज कोणतीही औषधे घेऊ नयेत.

### लोभाचे फळ

अकबराने कोणताही अवघड किंवा गुढ प्रश्न विचारावा आणि बिरबलाने आपल्या बुद्धिचातुर्याने उत्तर द्यावे असे नेहमी घडत असे. बिरबलही प्रत्यक्ष उदाहरणातून असे उत्तर देत असे की बादशहा अकबरासह दरबारातील सर्व मानकरी आश्चर्यचकित होत असत. एकदा अकबराने बिरबलाला विचारले की, 'राजउद्यानातील कोणीही पाहिलेली नाही अशी आश्चर्यकारक गोष्ट तू मला दाखवू शकशील का? त्यावर बिरबलाने तात्काळ 'हो' 'म्हटले. त्यासाठी बिरबलाने राजमहालातून भरपूर मध मागवून घेतलं. त्या शाही उद्यानात वातमृग येत असे. हा अतिशय दुर्मीळ आणि मानवाची चाहूल लागताच क्षणात पळून जाऊन दिसेनासा होणार प्राणी, बिरबलाने आणलेला सर्व मध त्या उद्यानातील गवतावर पसरवून टाकला.

थोड्यावेळाने वातमृग आला. खाता खाता त्याला गवत गोड लागल्याने तो गवत खाण्यात गुंगू होऊन गेला. वातमृगाने तेथील सारे गवत खाऊन संपविले, तेव्हा बिरबलाने आपल्या जवळील मधमिश्रित थोडे थोडे गवत त्याच्यासमोर टाकत टाकत त्याला राजवाण्यात गवत खाण्यात गुंगलेला वातमृग राजवाड्यात आला.

बिरबल म्हणाला, महाराज, हे पाहा उद्यानातील वेगळे आश्चर्य, जो वातमृग माणसाची चाहूल लागताच क्षणात दिसेनासा होतो तो आज भर दरबारात आला आहे. राजाने आपल्या प्राणीसंग्रहालयाचे वैभव वाढविण्यासाठी लगेच त्या वातमृगाला आपल्या प्राणी संग्रहालयात दाखल केले आणि वातमृग कैद झाले.

**तात्पर्य :** लोभ आवरता आला नाही की घात हा ठरलेलाच असतो.

## जीवन का अमृत (भाग १)



कृपया गुरु-शक्ति में विश्वास रखकर, अंतर में और अधिक जोश के साथ जुट जाएँ ।

सुरत शब्द योग, प्रभु की देन है तथा प्रकृति की और देनों की तरह, यह भी मुफ्त दी जाती है। इस भौतिक संसार में रहते हुए, आपको इन सिद्धांतों को, अच्छी से अच्छी

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

भाषा में, और लोगों को बताना है, ताकि वे इन सिद्धांतों को समझ सकें।

यह एक विज्ञान है, प्रेम- तरंगों का एक अचूक विज्ञान ।

दिव्य आवाज़ को सुनना एक अलग अभ्यास है। इसमें आपको पवित्र नामों का जाप नहीं करना, न ही आंतरिक दृष्टि को एक बिन्दु पर टिकाना है । आपको केवल भौंहों के पीछे रहकर, आवाज़ को, जहाँ से भी वह आती हो, ध्यान लगाकर सुनना है। आवाज़ पास आ जाएगी, तेज़ हो जाएगी और आखिर में ऊपर से आने लगेगी और आपकी आत्मा को उच्चतर मंडलों में ले जाएगी।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

जब ब्लड लेने की बात फाइनल हुई तो जगदीश भाई मेरे से पूछते हैं, कितना दोगे? मैंने कहा, जितनी आवश्यकता है उतना। फिर पूछने लगे, वो कितना होता है ? फिर वही खीर वाली बात आ गयी। मैंने फिर उनको हँसा दिया कि यह बतख का काम नहीं है। खून का काम है, जितना ज़रूरी है उतना ही ले लेंगे। क्या ड्रामा रहा वो

### आज्ञा चक्र

ब्लड ट्रान्समिशन का ! सुबह उनको भर्ती किया। वैसे उनको ४८ घंटे हॉस्पिटल में रखना था। दो घंटे के बाद कहते हैं, अब मुझे घर जाना है। मैंने कहा, जगदीश भाई, ऐसे कैसे जायेंगे घर ? उन्होंने कहा, मैं शाम तक वापस आ जाऊँगा। मुझे पता था, दादी जानकी भी ऐसे ही कहती थीं, मैं वापस आ जाऊँगी। जब गयी तो गयी, वापस कभी नहीं आयेंगी। अगले दिन शनिवार था। फिर बहुत कोशिश करने के बाद छुट्टी मिली कि शाम तक वापस आ जाना। फिर शनिवार सुबह आये

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'कारण...'

'यार मला समजत नाही 'तो' आपल्याशी असं का वागतो ?' हा प्रश्न मला, आमच्या मित्राने विचारला तेव्हा मी उत्तरलो, 'कारण त्याने ठरवलं आहे तसंच वागायचं. आणखी महत्वाचं कारण म्हणजे 'तो' पैसाच सर्वस्व मानतो. आपल्या मैत्रीचा उपयोग तो स्वार्थासाठीच करतोय हे माझ्या लक्षात आलंय. त्यामुळे आजपासून तो माझा मित्र नाही दोस्त आहे.' माझ्याकडे त्याने आश्चर्याने पाहिलं, तेव्हा मी म्हणालो मैत्रीत कधीच स्वार्थ नसतो 'कारण' विषयी लिहितांना मी नेमकं हेच उदाहरण का घेतलं ? ह्याचं कारण आहे आपल्या मित्रमंडळीत 'त्याच्या' सारखा एखादा असतोच. 'साहित्य सहवास' चे लेख, लघुकथा ज्यांच्याकडुन मी डी टी पी करुन घेतो ते अभिजीत मालवंडे. अभिजीत मला अनेकदा म्हणाले हे लेख, लघुकथा मी फक्त टाईप करत नाही तर ते माझ्यात उतरवण्याचा प्रयत्न करतो आहे कारण हे वाचुन माझ्यात चांगल्या अर्थाने बदल होताहेत. शब्दांवर प्रेम करावंच कारण शब्द हृदयात, मनात घर करतात.

आपलं जीवन खऱ्या अर्थाने चांगलं होऊ शकतं कारण शब्द. साडेपाचशेपेक्षा अधिक लेख, लघुकथा मी 'साहित्य सहवास' करिता लिहिल्या आहेत ह्याचं कारण अभिजीत मालवंडे ह्यांसारखे हजारो वाचक. एकदा शांतपणे बसुन मी विचार केला माझा जन्म फक्त एलआयसी मध्ये नोकरी करण्यासाठीच झालाय का ? एलआयसी माझं अवघं जगणं समृध्द करणारी माऊली आहे. माझ्या वरील प्रश्नाचं उत्तर मनाने दिलं नोकरी करुन उरलेल्या वेळेत माझ्या हातुन खूप चांगलं असं घडु शकतं. कारण हाच उरलेल्या वेळेचा सदुपयोग आहे. माझे ऑफिसमधील सहकारी, कोपरगावचे मित्र तसेच इतर ठिकाणचे मित्र - मैत्रिणी, स्नेहांकित परिवार ह्यांच्या माध्यमातुन जे जे चांगलं समाजासाठी करणं आहे ते ते सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेने करतो आहोत कारण आपण 'माणूस' म्हणून जन्माला आलो आहोत तर 'माणूस' म्हणून एकमेकांकडे पाहाणं आपलं आद्य कर्तव्य आहे. आपण एकांकिका अथवा नाटक पाहात असतांना एखादं पात्र रंगमंचावर येतं कारण त्या पात्राचा त्या नाटकाशी कुठेना कुठे काही संबंध असतोच कारण त्या पात्राचं रंगमंचावर येण्याशिवाय त्या एकांकिका, नाटकाला परिपूर्णता येणारंच नसते.

'साहित्य सहवास' च्या लेख, लघुकथांना गेल्या साडे अकरा वर्षांत हजारो अभिप्राय आलेत कारण प्रत्येक लेख, लघुकथा वाचकांना काही चांगलं असं देऊ शकली म्हणूनच. मला वाटतं आपल्या दैनंदिन जीवनात जे काही घडतं (उदाहरणार्थ एखाद्या व्यक्तीशी ओळख होते, नवा विचार, अनुभव ऐकायला मिळतो, एखादी घटना आपल्या समोर घडते, आपल्या हातुन एखादी अत्यंत चांगली कृती घडते. एखादा सकारात्मक विचार मनात येतो इत्यादी) त्यामागे निश्चित असं कारण नक्कीच असतं, असायलाच पाहिजे. एक गोष्ट प्रकर्षाने मला जाणवली आहे की प्रत्येक वेळी कारण असेल तर देणगी द्यायची असं नसतं. कोणत्याही कारणाशिवायही आमचे काही मित्र, मैत्रिणी वेगवेगळ्या व्यक्ती, कुटुंबांना त्या त्या वेळी जे गरजेचं आहे ते ते देतो, ह्यापुढेही देणारंच आहोत कारण आम्ही माध्यम आहोत, कर्ता-करविता निसर्ग, परमेश्वर आहे. मी वेळोवेळी दै. नवा मराठा परिवाराचे मा.ललितजी गुंदेचा आणि अभिप्राय देणाऱ्या हजारो वाचकांचे मनापासुन आभार मानतो कारण ह्यांच्या अभिप्रायांमुळं, ललितजींनी उपलब्ध करुन दिलेल्या 'दै. नवा मराठा' मुळं अधिकाधिक लिहिण्यासाठी बळ मिळतं. प्रेरणा मिळते, आनंदी जीवन जगण्यासाठी हे आवश्यक आहे. फार मोठ्या संख्येने मित्र असलेच पाहिजेत असं काहीही नाही कारण त्यातले अनेकजण स्वार्थासाठी आपल्या मैत्रीचा उपयोग करत असतील तर अशांसोबत मैत्री नकोच.

आपल्या घरी मंगलकार्य आहे. एखादी व्यक्ती कारणास्तव येऊ शकली नाही तर आपण त्याच्यावर रागावन, चिडुन, त्याच्याशी अबोला धरुन काय साध्य होणार आहे ? काहीच साध्य होणार नाही. त्याला समजुन घेणं महत्वाचं आहे कारण त्याच्याजागी असतो तर मी सुध्दा तेच केलं असतं हे लक्षात येतं. म्हणूनच कारणाला फार महत्व आहे. 'कारण' चा समारोप करताना मी विचारु शकतो की माझा जन्म कशासाठी झाला आहे ? हा एकच प्रश्न कधीतरी एकदा स्वतःला विचारा. जन्माचं कारण समजलं की जगण्याला नवा आयाम मिळेल. प्रश्न आहे तर उत्तर आहेच. उत्तराचा शोध म्हणजेच कारणाचा शोध. आनंदी राहा. स्वतःची काळजी घ्या. कारण आपण आहोत म्हणून जीवनाचा आस्वाद घेऊ शकतो. रडण्याऐवजी लढायचंच कारण जगणं म्हणजेच लढणं.

(लेख क्र.५५९)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : बंड्या, मला सांग, कोणता पक्षी सर्वात वेगाने उडतो?

बंड्या : सर, ज्याला लवकर घरी जायचं असतं तो!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❋ स्वच्छ सर्वेक्षण २०२२ नुसार देशातील सर्वात स्वच्छ शहर कोणते?

- इंदोर (मध्यप्रदेश)

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

त्यामुळे प्रत्येक सणाचे शास्त्रीय महत्त्व जाणून त्यानुसार आहार घ्यावा. मांसाहार करणाऱ्या स्त्रियांनी चिकन, मटण, मासे, अंडी असा मांसाहार करावा. फक्त त्याचे प्रमाण कमी असावे.

**विहार :**

हेमंत ऋतूप्रमाणेच विहार असावा.

### बौद्धिक विकास कसा करावा?

**आयुर्वेदिक उपचार :** हेमंत ऋतूप्रमाणेच उपचार करावेत.

अशा पद्धतीने प्रत्येकाने ऋतुनुसार आहार-विहार पाळून आपले आरोग्य सांभाळावे. केवळ एखादा आजार झाल्यानंतरच डॉक्टरांना भेटायचे नसते, तर स्वास्थपूर्ण निरोगी आयुष्य कसे जगावे,

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सुपरव्हिजन काम म्हणजे नेमके काय?












जेव्हा आपण एखादया बंगला अथवा इमारतीचे काम सुरु करणेबाबत विचार करत असतो तेव्हा नेहमी कानावर पडणारे शब्द काम स्वतः करून घेणार कि सुपरव्हिजनवर देणार ? हे असतात.

सुपरव्हिजनने बांधकामाची देखरेख करणे म्हणजे आर्किटेक्टने दिलेल्या प्लॅनप्रमाणे आणि आर. सी. सी. डिझायनरने दिलेल्या डिझाइन प्रमाणे जागेवर सदर काम करण्याबाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे. म्हणजेच आर्किटेक्टच्या कल्पनेत असलेली आणि त्यांनी प्लॅनच्या माध्यमातून कागदावर रेखाटलेली इमारत आर. सी. सी.डिझाइनने दिलेल्या डिझाइनप्रमाणे जागेवर मूर्त स्वरुपात तांत्रिक पद्धतीने उतरविण्यात सर्व तांत्रिक मदत करणे.

साईट सुपरव्हिजनचा रोल हा आर्किटेक्ट, आर. सी. सी. डिझाइनर इतकाच महत्वाचा असतो किंबहुना त्या इमारतीच्या बांधणी मध्ये प्रत्यक्ष सहभाग इंजिनिअरचा असल्याने त्याला आर्किटेक्ट आणि आर. सी. सी. डिझाइनर इतकेच महत्व असते.

**सुपरव्हिजन कामाचा स्कोप :**

अ) सर्वप्रथम जागा मालक अथवा विकसक यांनी आर्किटेक्ट कडून प्लॅन फायनल केल्यानंतर सर्व वर्किंग प्लॅनचा सेट आणि आर सी सी डिझाइन बनवून घेण्यास मार्गदर्शन करणे.

ब ) काम करणाऱ्या सर्व एजन्सीचे अँग्रीमेंट बनवणे आणि त्यांचे कामाचे लेबर रेट फायनल करून घेणे.

क) कामास लागणाऱ्या मटेरीअलची क्वॉटीटी वेळोवेळी विकसक यांना काढून देणे.

ख) बहुमजली इमारतीमध्ये सेफ्टी उपाययोजनांकडे जास्तीत जास्त लक्ष देऊन कामगारांच्या सुरक्षेस प्राधान्य देणे.

कामगारांचा इन्शुरन्स सदर कॉन्ट्रॅक्टर / ठेकेदार यांनी काढणेबाबत आग्रही राहणे आणि सदर कराराची एक प्रत विकसक यांना देणे बंधन कारक करावे.

ग) आर. एम. सी. चा वापर करत असल्यास त्याच्या मालाच्या उत्तम दर्जाबाबत तसेच मिक्स डिझाइन, क्यूब टेस्टिंग यास प्राधान्य देणे.

मोठ्या प्रोजेक्टमध्ये एम. ई. पी.कन्सल्टंट, पी. एम. सी. टीमची नियुक्ती करणेबाबत विकसक यांना सूचना देणे.

आर्किटेक्ट, आर. सी. सी. डिझाइनर, पी. एम. सी. टीम, एम. ई. पी.कन्सल्टंट, इंटेरीअर डिझाइनर यांचा विकसकाबरोबर योग्य समन्वय ठेवणे बाबत चर्चेसाठी वेळोवेळी सर्वांची एकत्र मिटिंग आयोजित करणे.

घ) प्रत्यक्षात काम योग्य पद्धतीने होण्यासाठी पुढील काळात होणाऱ्या कामाचे आधीच नियोजन करणे.

**सुपरव्हिजन कामाचा करारनामा :**

सुपरव्हिजन कामाची फी हि शक्यतो कामाच्या एकूण होणाऱ्या खर्चाच्या टक्केवारी वर ठरवली जाते. साधारण एकूण बांधकाम खर्चाच्या ५ ते १० % सुपरव्हिजन चार्जेस आकारले जातात. ही रक्कम विकसक आणि सुपर व्हिजन करणारा इंजिनिअर यांनी कामाची तांत्रिक निकड, आकारमान आणि स्कोप याप्रमाणे सामोपचाराने फायनल करायची असते.

प्लॅनिंग प्रोसेस , लाईन आउटपासून फायनल इमारत फिनिशिंग पर्यंत म्हणजेच टर्न कि प्रोजेक्टपर्यंत सुपरव्हिजन करणाऱ्या इंजिनिअरने विकसक यांना योग्य मार्गदर्शन करायचे असते.

सुपरव्हिजन करारनाम्यामध्ये त्यांनी करावयाच्या कामाचा तपशील, जबाबदारी, विकसक यांनी द्यावयाच्या सुपरव्हिजन पेमेंटचे टप्पे यांचा उल्लेख असून विकसक आणि सुपरव्हिजन करणारा इंजिनिअर यामध्ये योग्य प्रकारे समन्वय साधण्यास याची आवश्यकता असते.

**सुपरव्हिजन कामामध्ये येणाऱ्या विविध गोष्टीविषयी सविस्तर माहिती :**

**आर. सी. सी. काम –** यामध्ये सेन्टरींग काम ठेकेदार फायनल करताना त्याचे वापरले जाणारे साहित्य, काम करणारे कामगाराचे स्कील, त्यांचा मार्केट मधील कामाचा अनुभव पाहणे हे सुपरव्हिजन करणाऱ्या इंजिनिअरचे काम असून त्यांनी केलेली आणि चालू असलेली कामे पाहून मालकांना त्यांची नियुक्ती व रेट फायनल करणेबाबत योग्य सल्ला द्यावा.

आर. सी. सी. काम करताना लाईन आऊट पासून कॉंक्रीट आणि डिशटरींग पर्यंत सर्व कामे तांत्रिक पद्धतीने करणेबाबत योग्य मार्गदर्शन करणे. वेळोवेळी ठेकेदाराची बिले करणे आर्किटेक्ट आणि आर. सी. सी. डिझाइनर यांच्या प्लॅनप्रमाणे काम होत असलेबाबत कामाची तपासणी करणे.

**बांधकाम प्लास्टरकाम –** यामध्ये सुपरव्हिजन करताना बांधकामाची प्लॅनप्रमाणे पेरणी करून देणे. सिल व लीन्टेल लेव्हल चेक करणे. प्लास्टर आणि बांधकाम लाईन, लेव्हल आणि ओळंबा व्यवस्थित आहे का? याची तपासणी करणे. वीट, वाळू, वॉशसँड, क्रश सँड आणि इतर वापरत येणारे सर्व बांधकाम साहित्य यांची गुणवत्ता बाबत विकसक यांना मार्गदर्शक करणे हा साईट इंजिनिअरचा मुख्य रोल असतो.

**फ्लोअरींग काम, प्लंबिंग काम, दरवाजे खिडकी फिटिंग, लाईट फिटिंग आणि पेंटिंग काम –** वरील कामे करताना इंटेरीअर डिझाइनरचे प्लॅन असतील तर त्याप्रमाणे कामाची तपासणी करणे, मटेरीअलचा योग्य दर्जाबाबत विकासकांना सल्ला देणे. मोठ्या कामात एम.ई.पी. कन्सलटंट यांची नियुक्ती करणे आणि त्यांचा योग्य समन्वय एजन्सीबरोबर घालण्याचे काम करणे. वरील फिनिशिंग कामात मटेरीअलचा दर्जा, कामाची पद्धत, लागणारा वेळ आणि अनावश्यक नुकसान टाळणे यामध्ये सुपरव्हिजन करणाऱ्या इंजिनिअरच्या अनुभवाचा कस लागतो.

**सुपरव्हिजन कामाचे महत्व :**

मालक आयुष्याची पुंजी आपला बंगला अथवा इमारत बांधताना खर्ची घालत असतो. हे करत असताना त्यांनी सुपरव्हिजन काम दिलेल्या तांत्रिक इसमावर पूर्ण विश्वास ठेऊन त्यांचा सल्ला मानणे फायद्याचे असते. कारण सुपरव्हिजन करणाऱ्या इंजिनिअरची नेमणूक तांत्रिक पद्धतीने काम करण्यास केलेली असल्याने योग्य ठिकाणी खर्च होणे आणि अनावश्यक कामासाठी खर्च टाळणे यासाठी मुख्यत्वे असून सर्वोत्तम कामास प्राधान्य देणे यामध्ये अपेक्षित असते.

सुपरव्हिजनवर दिलेल्या कामामध्ये योग्य ठिकाणी खर्च करून इंजिनिअरच्या कामाचा अनुभवाचा फायदा मालकांना होतो. अनावश्यक तोडफोड आणि खर्च टाळला जातो. चांगल्या एजन्सी कामास उपलब्ध असून प्रत्येक टप्प्यास चेकिंग होत असल्याने दर्जेदार काम होते.

**सुपरव्हिजनचे काम कोणाला द्यावे :** बांधकाम क्षेत्रातील अनुभव असलेल्या व त्याबाबत तांत्रिक शिक्षण घेतलेल्या व्यक्तीसच आपल्या बंगला अथवा इमारतीचे सुपरव्हिजनचे काम द्यावे. माफक खर्चात आणि तंत्रशुद्ध पद्धतीने काम केल्यास त्याचा दीर्घकालीन फायदा विकसक यांना नक्कीच सुपरव्हिजन कामाच्या माध्यमातून होतो.

**अरिहंत कन्स्ट्रक्शनविषयी :** आम्ही १९९३ पासून आर्किटेक्चरल, इंजिनिअरींग, पी एम सी, विथ मटेरीअल अशा स्वरुपाची रो – हाउस, बंगलो, ट्वीन बंगलो, अपार्टमेंट, हॉस्पिटल, स्कूल बिल्डींग, ग्रुप हाउसिंग आणि ले आउट अश्या प्रकारची कामे करत आहोत.

अरिहंत कन्स्ट्रक्शन या टीममध्ये पुढील टीम मेंबर्स आहेत. इंजि. अभय पटवा, इंजि. गिरीश पटवा, इंजि. विशाल गोरे , आर्कि. प्रगती पटवा, आर्कि. अश्विनी मुथियान आणि इंटेरीअर डिझायनर खुशी पटवा.



**– इंजि. अभय पटवा व इंजि. गिरीश पटवा**
**फर्म – अरिहंत कन्स्ट्रक्शन वास्तू कन्सल्टंट, आर्किटेक्ट, इंजीनिअर, (एसा सभासद )**
**ऑफिस पत्ता – अरिहंत प्लॉट नं. २, केडगाव देवी रोड, उर्जा गुरुकुल स्कूल समोर, केडगाव, अहिल्यानगर.**
**मो. – ९४२२२२१८९७ / ९६१५१४४१४४.**
**मेल आय डी –** abhaypatwa@yahoo.com

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स अॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar
www.aesanagar.com
Reg. No. Mah/1393/1987 F 1350/1988/ANR

## श्री संत सावता महाराज पुण्यतिथी निमित्त २१ ते २३ जुलैदरम्यान महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर

नगर – श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकीतून सरस्वती हॉस्पिटल, माळीवाडा यांच्या वतीने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिर २१ ते २३ जुलैपर्यंत दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत सरस्वती हॉस्पिटलमध्ये पार पडणार आहे, अशी माहिती हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. अमोल जाधव यांनी दिली.

महिलांचे आरोग्य हे कुटुंबाच्या सुदृढतेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु बहुतेक वेळा महिलांकडून स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्राथमिक टप्प्यावर आढावा घेणे गरजेचे असते. या शिबिराच्या माध्यमातून आम्ही महिलांना मोफत तपासणीची सुविधा उपलब्ध करून देत आहोत.

गर्भाशय व स्तनाच्या आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे निरीक्षण असून, याचे लवकर निदान होणे आवश्यक आहे. शिबिरात यासंबंधी तपासण्या व मार्गदर्शन केले जाणार आहे. आमच्या हॉस्पिटलतर्फे दरवर्षी अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते, आणि महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या शिबिरात महिलांच्या विविध आरोग्यविषयक तपासण्या करण्यात येणार असून, त्यामध्ये रक्तदाब, हिमोग्लोबिन, मधुमेह, स्तन आणि गर्भाशयासंदर्भातील प्राथमिक तपासण्या यांचा समावेश असणार आहे.

## श्री संत सावता महाराज पुण्यतिथी निमित्त माळीवाडा येथे पारायण सोहळ्याला सुरुवात



श्री संत सावता महाराज पुण्यतिथी निमित्त माळीवाडा येथे पारायण सोहळ्याला सुरुवात झाली.

नगर – माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त आयोजित सप्ताह उत्सवाच्या निमित्ताने हरिनाम संकीर्तन व अखंड पारायण सोहळ्याला सुरुवात झाली. अध्यात्म, भक्ती आणि समाजप्रबोधन यांचे अद्वितीय त्रिवेणी संगम साधणाऱ्या या पारायण सोहळ्यात भक्तिरसाने भारलेले वातावरण निर्माण झाले आहे.

पारायण सोहळा भाविकांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू ठरत असून, महिलावर्गासह तरुणांमध्येही मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून येत आहे. ह.भ.प. प्रभाताई भोंग यांच्या ओजस्वी वाणीतील हरिपाठ, संतवाङ्मयाचे सादरीकरण, आणि सामाजिक जाणीवेने युक्त उपदेश यामुळे श्रोते मंत्रमुग्ध होत आहेत. त्यांनी संत सावता महाराजांच्या जीवनकार्याचा परामर्श घेत भक्तीमार्गातील सात्त्विकता व कर्मशीलतेचे महत्त्व अधोरेखित केले. हा पारायण सोहळा उत्सव समितीचे प्रमुख छबूनाना जाधव, कैलासराव खरपुडे, चंद्रकांत ताठे, अशोकराव कापरे आदींच्या मार्गदर्शनातून पार पडत आहे. त्यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वामुळे संपूर्ण सप्ताह उत्सव अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात साजरा होत आहे.

पारायण, हरिपाठ, भजन, कीर्तन आणि महाराजांच्या शिकवणीवर आधारित व्याख्याने यामुळे संपूर्ण परिसर अध्यात्मिकतेने भारावून गेला आहे. अनेक भाविक सकाळपासून रात्रीपर्यंत कार्यक्रमात सहभागी होत असून, पुण्यस्मरणाच्या या पर्वाने माळीवाडा परिसराला भक्तिरसात चिंब भिजवले आहे. सप्ताहाच्या सांगतेला महाप्रसाद व हरिपाठ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री संत सावता महाराज यांच्या प्रेरणेने सुरू झालेला हा सप्ताह, समाजाला एकत्र आणणारा आणि आध्यात्मिक उन्नतीकडे नेणारा ठरतो आहे.



सावेडी येथील सोनी गिफ्ट प्रायव्हेट लिमिटेडच्या एक्स्चेंज ऑफरनिमित्त खरेदीसाठी ग्राहकांची झालेली गर्दी. ग्राहकांच्या वाढत्या प्रतिसादामुळे ही ऑफर २७ जुलैपर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

## भाजपच्या बूथ व शक्ती केंद्रांच्या सक्षमीकरणासाठी २० व २१ जुलैला नगरमध्ये प्रभागनिहाय बैठकांचे आयोजन

नगर – भारतीय जनता पार्टीच्या अहिल्यानगर शहरातील बूथ व शक्ती केंद्रांच्या सक्षमीकरणासाठी २० व २१ जुलै रोजी अहिल्यानगरमध्ये प्रभागनिहाय बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी दिली.

२० जुलै रोजी सिद्धीबाग येथील सिद्धेश्वर महादेव मंदिरात प्रभाग १६ व १७ ची बैठक सकाळी १० वाजता होईल. तसेच १४ व १५ प्रभागांची बैठक सकाळी ११ वाजता, १२ व १३ प्रभागांची बैठक दुपारी १२ वाजता, १० व ११ प्रभागांची बैठक दुपारी एक वाजता व प्रभाग ९ ची बैठक दुपारी ३ वाजता होणार आहे.

२१ जुलै रोजी तारकपूर येथील हॉटेल व्हीस्टार येथे प्रभाग १ व २ ची बैठक सकाळी १० वाजता, ३ व ४ प्रभागांची बैठक सकाळी ११ वाजता, ५ व ६ प्रभागांची बैठक दुपारी १२ वाजता तसेच प्रभाग ७ व ८ ची बैठक दुपारी एक वाजता होणार आहे.

या दोन्ही दिवसांच्या बैठकींमध्ये सर्व प्रभागांमधील बूथ व शक्तीकेंद्रांचे सक्षमीकरण करण्यासाठी पदाधिकाऱ्यांशी व कार्यकर्त्यांशी चर्चा करून नियोजन करण्यात येणार आहे. या बैठकींना माजी नगरसेवक, राज्य परिषद सदस्य सुनील रामदासी व अशोक गायकवाड, माजी नगरसेवक धनंजय जाधव, बाबासाहेब वाकळे यांच्यासह केडगाव मंडलाचे अध्यक्ष भरत ठुबे, मध्य मंडळाचे अध्यक्ष मयूर बोचूघोळ, सावडी मंडलाचे अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे व भिंगार मंडलाचे अध्यक्ष सचिन जाधव, महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे, ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांच्यासह पमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या दोन्ही बैठकींना त्या त्या प्रभागातील सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सरचिटणीस महेश नामदे यांनी केली आहे.

जाहीर सूचना

आम्ही मे. वरद मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल प्रायवेट लिमिटेड. सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने आमच्या सर्वे नं. 248/6/248/7/249/6/249/7 पी. नं. 4 + सर्वे नं. 248/6/248/7/249/6/249/7 पी. नं. 1+2+3+4 + सर्वे नं. 247/1अ पी नं. 1+ सर्वे नं. 249/8 पी नं 1, पाईप लाईन रोड, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र येथिल गृह आणि व्यावसायिक प्रकल्पाला दिनांक 14 जुलै 2025 रोजी पत्र क्रमांक - **EC24C3803MH5497053N**. अन्वेय पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून मान्यता दिली आहे. सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या **http://parivesh.nic.in/** संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**मे. वरद मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल प्रायवेट लिमिटेड.**



**Public Notice**

We, M/s. Varad Multispeciality Hospital Private Limited hereby bring to the kind notice of general Public that Environment Department, Government of Maharashtra has accorded Proposed Environmental Clearance for our Hospital & Commercial Project located at Sr. No. 248/6/248/7/249/6/249/7 P. No.4 + S. No.248/6/248/7/249/6/249/7 P. No. 1+2+3+4 + S. No. 247/1A P. No.1 S. No. 249/8 P. No 1, Pipe line Road, Savedi, Ahmednagar, Maharashtra vide letter dated 14th July 2025 bearing file No. **EC24C3803MH5497053N**. The copies of the clearance letter are available with Maharashtra Pollution Control Board and may also be seen on the Website of the Department of Environment, Government of Maharashtra at **http://parivesh.nic.in/** -

**M/s. Varad Multispeciality Hospital Private Limited**

## न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये ‘फुल स्टॅक डेव्हलपमेंट’ ट्रेनिंग प्रोग्रामचा प्रारंभ

### कॅपजेमिनीच्या CSR फंडातून विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण सुरू; वर्चुअल ए आय लॅब उभारण्यात मराठा विद्या प्रसारक समाजाचाही विशेष पुढाकार

’फुल स्टॅक डेव्हलपमेंट’ ट्रेनिंग प्रोग्राम आणि जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाने खास तयार केलेल्या ’टेक्नोलॉजी ट्रेनिंग प्रोग्राम’चा उद्घाटन समारंभ कॉलेजच्या राजर्षी शाहू सभागृहात पार पडला.

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजच्या सेंटर फॉर एडवांस्ड स्टडीज इन अप्लाइड सायन्सेस (CASAS) मध्ये आज एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकण्यात आले. डेटा सायन्स, कॉम्प्युटर सायन्स, बीसीए आणि क्लाउड कंप्युटिंगच्या विद्यार्थ्यांसाठी कॅपजेमिनी (Capgemini) या माहिती तंत्रज्ञान कंपनीच्या सीएसआर फंडातून सुरू करण्यात आलेल्या ’फुल स्टॅक डेव्हलपमेंट’ ट्रेनिंग प्रोग्राम आणि जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाने खास तयार केलेल्या ’टेक्नोलॉजी ट्रेनिंग प्रोग्राम’चा उद्घाटन समारंभ कॉलेजच्या राजर्षी शाहू सभागृहात पार पडला. या सोहळ्यासाठी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव अ‍ॅड. दीपलक्ष्मी म्हसे, विश्वस्त मुकेश मुळे यांसह सिम्बायोसिस विद्यापीठाचे प्रोजेक्ट मॅनेजर बळीराम बोंडगे, अ‍ॅकेडमिक डायरेक्टर श्रीमती राशी खांडेकर, प्रज्ञा कळमकर, डेटा टेक लॅब्सचे प्रमुख डॉ. अमित आंद्रे, प्राचार्य बाळासाहेब सागडे आणि कॅसेसचे प्रमुख प्रा. अरुण गांगर्डे आदी उपस्थित होते.

या मार्गदर्शनपर कार्यक्रमात विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना तांत्रिक कौशल्ये, व्यावसायिक गरजा आणि व्यक्तिमत्त्व विकास यावर मार्गदर्शन केले.

डेटाटेक लॅब्सचे CEO डॉ. अमित आंद्रे यांनी आजच्या युगात प्लाइड डेटा इंजिनिअरिंग आणि कॉन्टेक्स्ट इंजिनिअरिंगच्या कौशल्यांचे महत्त्व विषद केले. तंत्रज्ञान कोणत्या ठिकाणी, कधी आणि कशासाठी वापरायचे याचे भान विद्यार्थ्यांनी ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. आंद्रे यांनी विकसित केलेल्या अत्याधुनिक ऐ आय लॅब ची माहिती सांगताना त्यांनी तीर्थक्षेत्रावरील गर्दी नियंत्रणासाठी एआय (AI) अल्गोरिदमच्या वापराचे वास्तव उदाहरण देऊन त्यांनी तंत्रज्ञानाच्या व्यावहारिक उपयोगाचे महत्त्व पटवून दिले. इंटर्नशिपमध्ये अप्लाइड सायन्सेसचा वापर करून प्रकल्प तयार करणे, टीमवर्क आणि संवाद कौशल्याचे महत्त्व यावरही त्यांनी भर दिला.

सिम्बायोसिस स्किल अ‍ॅण्ड प्रोफेशनल इन्स्टिट्यूटचे बळीराम बोंदगे यांनी सीएसआर फंड, मेंटॉरिंगची संकल्पना आणि विद्यार्थ्यांना इंडस्ट्री लेव्हल तांत्रिक ज्ञान देणाऱ्या ’फुल स्टॅक जावा प्रोग्रॅम’बद्दल माहिती दिली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, मार्गदर्शन आणि प्लेसमेंटसाठी सहाय्य मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशिक्षणानंतर घेतले जाणारे मॉक इंटरव्ह्यूज विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्यात वाढ करतात, असेही त्यांनी नमूद केले.

राशी खांडेकर (सिम्बायोसिस) यांनी विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक दृष्टिकोनातून नव्हे, तर प्रत्यक्ष उद्योगजगतात उपयोगी पडतील अशा प्रकारे तयार होणे गरजेचे असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी ज्ञान केवळ मिळवण्यापुरते मर्यादित न ठेवता, त्याचा वापर प्रत्यक्ष जीवनातील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी करावा, यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यांनी सॉफ्ट स्किल्सच्या गरजेवरही लक्ष वेधले.

संस्थेचे सचिव विश्वासराव आठरे पाटील यांनी विद्यार्थ्यांना एआय आणि संगणकाचे महत्त्व पटवून देत, स्पर्धेच्या जगात टिकण्यासाठी तांत्रिक ज्ञान गरजेचे असल्याचे सांगितले.

अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत संस्थेकडून सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. प्रशिक्षणाच्या माध्यमातून मिळणाऱ्या ज्ञानाचा फायदा घ्यावा आणि विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. विभागासाठी आवश्यकतेनुसार सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील असेही त्यांनी सांगितले.

विभागप्रमुख प्रा. अरुण गांगर्डे यांनी प्रास्ताविकामध्ये विभागातील शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी उपस्थितांचे स्वागत करून महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. प्रा. मंजिरी करखिले यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. दिपाली जगदाळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विभागातील शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# गवळी समाजाच्या विकासासाठी श्रीकृष्ण महामंडळ निव्वळ घोषणा

नगर – महाराष्ट्र शासनाचे इतर मागास विभागाने गवळी समाजाचे सर्वांगीन विकासासाठी १५ ऑक्टोबर २०२४ रोजी श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली. सदरचा शासकीय आदेश हा विधानसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता सुरु झाल्यानंतर काढण्यात आला आणि गवळी समाजाची मते मिळविण्यासाठी काढला असा आक्षेप आघाडीच्या आमदारांनी घेतला. या महामंडळामार्फत गवळी समाजाचा विकास होईल याकडे दुर्लक्ष करुन स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी, विरोधासाठी विरोध केला. त्यामुळे शासनाने सदरच्या शासकिय आदेशाची अंमलबजावणी स्थगित केली. नंतर शासनाने पुन्हा ४ मार्च २०२५ रोजी श्रीकृष्ण महामंडळाची स्थापना केल्याबाबत नवीन आदेश काढला. वसंतराव नाईक भटक्या जमाती महामंडळाच्या अहिल्यानगर शाखेत मी समक्ष भेट देवून चौकशी केली असता, श्रीकृष्ण महामंडळास अद्याप निधी प्राप्त झाला नाही अशी माहिती मिळाली. विजाभज महामंडळाच्या अंतर्गत अनेक जुन्या महामंडळांना शासनाने निधी वितरीत केला आहे. राज्यकर्त्यांना भारतीय घटनेतील समानतेच्या तत्वाचा हेतूपुरस्सर विसर पडुन त्यांनी गवळी समाजाच्या विकासासाठी निधी वितरीत केला नाही. श्रीकृष्ण महामंडळाचा शासकीय आदेश काढून तीन महिने झाले तरी अद्याप निधी प्राप्त झाला नाही. त्यामुळे गवळी समाज बांधवांत निराशा आहे. महाराष्ट्रात गवळी समाजाची लोकसंख्या ८ ते १० लाख इतकी आहे. गवळी समाज विखुरलेला आहे. त्यामुळे एकगठ्ठा मतदार नसल्याने समाजाचा आमदार निवडुन येवू शकत नाही. शासनाचे निधी वाटपात समानता, निपक्षपातीपणा, पारदर्शकता नसल्याने गवळी समाज उपेक्षित राहिला आहे. भविष्यात लवकर निधी न मिळाल्यास आंदोलन करुन निधी देण्यास शासनास भाग पाडू असे निवेदन हिरामन बेद्रे, कार्यकारिणी सदस्य, महाराष्ट्र गवळी समाज संघटना यांच्यामार्फत देण्यात येत आहे.

# संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्यातील आरोपीवर कडक कायदेशीर कारवाई करा

नगर – छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, लोकराजा राजश्री छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचे पुरोगामी विचार जपणारे व बेरोजगार युवकांना रोजगारासाठी उद्योगपती घडवणारे एकमेव नेतृत्व संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे शाई फेक करणाऱ्या विकृत मनोवृतीचा निषेध भारतीय जनसंसदच्यावतीने करण्यात येत आहे.

संघटनेच्या नावात छत्रपती संभाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याबद्दल आक्षेप घेत प्रवीण गायकवाड यांची गाडी अडवून अक्कलकोट येथे शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी शाई फेकून या वेळी त्यांना धक्काबुक्की ही झाली. ते एका कार्यक्रमासाठी आले असता, हा प्रकार घडला. या प्रकरणी 'शिवधर्म'चे अध्यक्ष दीपक काटे (पुणे) यांच्यासह सात जणांविरुद्ध अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या भ्याड हल्ल्यामुळे राज्यातील कायदा सुव्यवस्थेतील गलथानपणा निदर्शनास येत आहे.

समाजात विद्वेश, असुरक्षतेची भावना पसरवून, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करून सामाजिक शांतता धोक्यात आणून, अराजकता पसरवण्याच्या या मनोवृतीचा कायदेशीर बिमोड करण्यात यावा, अशी मागणी भारतीय जनसंसद संघटनेच्यावतीने अशोक सब्बन, रवि सातपुते, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, बाळासाहेब पालवे, विक्रम क्षिरसागर, इम्रान तांबोळी, बबलू खोसला, नलिनी गायकवाड, शिवाजी भोसले, शेख रईस बशीर यांनी केली आहे.


## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड
(पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)

Truhome FINANCE

**नोंदणीकृत कार्यालयः** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र. ११ दुसरी गल्ली, सिनातोफा रोड, अलवारपेट, तेनमपेट, चेन्नई–६०००१८; **मुख्यालय** : लेव्हल – ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी–२, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

### ताबा सूचना

तर, ट्रू होम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) चे अधिकारी म्हणून खाली स्वाक्षरी केलेले, सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ (वक्ते कायदा) च्या तरतुदीनुसार आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२ (वक्ते नियम) च्या नियम ३ सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३(१२) अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदारांना डिमांड नोटीस जारी केल्या आहेत. ज्यांचे तपशील खाली दिलेल्या लेबलमध्ये नमूद केलेल्या डिमांड नोटिसमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यासाठी दिले आहेत. कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, अधिकृत अधिकारी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी सदर कायद्याच्या कलम १३ (४) आणि सदर नियम ८ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा भौतिक ताबा घेतला आहे. विशेषत : कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून येथे नमूद केलेल्या रकमेवर व्याजासह शुल्क आकारले जाईल.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्ता परत करण्यासाठी.

**कर्जदाराचे नाव आणि पत्ता**

१. श्री.गायकवाड सचिन हरिभाऊ (कर्जदार)
२. श्रीमती गायकवाड वैशाली सचिन (सह–कर्जदार)

सध्याचा पत्ता: फ्लॅट क्रमांक १०३, शिव कॉम्प्लेक्स, प्लॉट क्रमांक १ सर्व्हे. क्रमांक १२४, ८१ ए २, भिस्तबाग,गजराज फॅक्टरीच्या समोर, सावेडी रोड, अहमदनगर, महाराष्ट्र–४१४००३. तसेच येथे : मालमत्तेचा पत्ता : पहिला मजला, शिव कॉम्प्लेक्स, सर्व्हे क्रमांक १२४८१ ए प्लॉट क्रमांक, १, फ्लॅट क्रमांक १०३, सावेडी रोड, अहमदनगर ४१४००३

**डिमांड नोटीसनुसार देय रक्कम**

कर्ज खाते क्रमांक SHLHAMDR0000691 च्या संदर्भात दिनांक ०७–०५–२०२५ रोजी रु. ३७,६८,८१२/– (रुपये सदोतीस लाख आडूसष्ट हजार आठशे बारा फक्त) सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत करारानुसार व्याजदराने.
मागणी सूचना दिनांक : १२/०५/२०२५
ताबा दिनांक : १६/०७/२०२५

**गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन**

पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक १०१, त्याचे कार्पेट क्षेत्रफळ ३७.३९ चौ.मी., त्याचे बिल्टअप क्षेत्रफळ ४३.०० चौ.मी., प्रकल्पित क्षेत्र ४.९४ चौ.मी. आणि अगणित क्षेत्र ७.०९ चौ.मी,, शिव कॉम्प्लेक्सचे प्लॉट नं.१ एकूण क्षेत्रफळ ३९९.४३ चौ.मी., अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर ता. नगर, अहमदनगर हद्दीतील भिस्तबाग येथे असलेल्या सर्व्हे क्रमांक १२/४/८/१ ए २, जे पूर्व–फ्लॅट क्रमांक १०२, दक्षिण–रस्ता, पश्चिम–रस्ता, उत्तर–फ्लॅट क्रमांक १०४ असे आहे.

ठिकाण: अहमदनगर
दिनांक १६–०७–२०२५

अधिकृत अधिकारी – ट्रूहोम फायनान्स लिमिटेड
(पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)


# बोगस कारभाराची एस.आय.टी. द्वारे चौकशी करा

## आ.संग्राम जगताप यांची विधिमंडळात लक्षवेधीद्वारे मागणी

नगर – नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील उर्दू माध्यमातील काही शैक्षणिक संस्थांमध्ये शासकीय अधिकारी व संस्था चालकांनी संगमताने बोगस कारभार करत शासनाच्या सुमारे १०० कोटीपेक्षा जास्त निधीची लूट केली आहे. या संबधित शैक्षणिक संस्थांची व शासकीय अधिकाऱ्यांची आर्थिक गुन्हेशाखा व विशेष चौकशी पथक (एस.आय.टी.) मार्फत चौकशी करण्याची मागणी करणारी लक्षवेधी सूचना आमदार संग्राम जगताप यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मांडली. यावेळी शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांनी लक्षवेधीला उत्तर देत सदर प्रकरणी तातडीने एस.आय.टी. मार्फत चौकशी करून उच्च न्यायालयातही सुरु असलेल्या सुनावणीस सरकार म्हणणे मांडणार असल्याचे सांगितले.




आ.संग्राम जगताप विधिमंडळात लक्षवेधी मांडताना म्हणाले, मालेगाव येथील उर्दू माध्यमातील अन्जुमन–ए–तालीम संचलित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, स्टूडंन्टस वेल्फेअर एज्युकेशन सोसायटी संचलित स्वेस हायस्कुल, अन्जुमन–मोईनुत–तुलबा संचलित मालेगाव हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज तसेच सिटीजन वेल्फेअर एज्युकेशन सोसायटी संचलित सरदार प्रायमरी स्कुल या शैक्षणिक संस्थांमध्ये नाविद अख्तर व्यक्तीद्वारे तत्कालीन शिक्षक उपसंचालक, शिक्षणाधिकारी, नाशिक जिल्हा परिषदेचे अधिक्षक यांच्याशी संगनमत करुन काही बनावट कागदपत्रे तयार केली. या बनावट कागदपत्राद्वारे नवीन तुकड्यांची मान्यता मिळवणे, तसेच कर्मचाऱ्यांची मागील तारखेची नेमणुक दाखवून ज्यांनी शाळेत मागील कोणत्याही तारखेस शाळेत सेवाच दिलेली नाही अशा शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती दाखवुन शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन शासनाकडुन प्राप्त करुन घेतले आहे.

आ.जगताप म्हणाले, सदर बेकायदेशीर कामामध्ये संबंधित शाळांचे प्राचार्य, मुख्याध्यापक तसेच लिपीक यांचा सहभाग आहे. या बोगस कारभाराच्या माध्यमातून शासनाची आजतागायत १०० कोटीपेक्षा जास्त निधीची लूट झालेली आहे. त्यानुषंगाने सिटीजन वेल्फेअर एज्युकेशन सोसायटी संचलित सरदार प्रायमरी स्कुल च्या संस्थाचालकांच्या विरोधात नाशिक ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये १०जून रोजी तक्रार क्र. ००८७/२०२५ दाखल झालेली आहे. शासनाच्या कोट्यावधी रुपयांच्या अपहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व संस्थांची आर्थिक गुन्हे शाखा यांच्यामार्फत तपास, तसेच विशेष चौकशी पथक (एस.आय.टी.) स्थापन करून चौकशी करून संबधितांना कडक शासन करावे, अशी भूमिका मांडली.

# खेळाडूंसाठी नवीन करण्याची ताकद अहिल्यानगर बुद्धिबळ संघटनेमध्ये आहे हे सिद्ध झाले

## नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन; दुसरी नरेंद्रजी फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन स्पर्धेचे बुद्धिबळ पटावर चाल देऊन शुभारंभ

नगर – अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या या क्लासिक फिडे रेटिंग चेस टूर्नामेंट मध्ये प्रतिसाद मिळालेला आहे व खेळाडू हा आपल्या बुद्धीचे बळ पणाला लावून प्रगती करत आहे. त्याकरिता या स्पर्धेमध्ये ४५० च्या पुढे खेळाडूंचा सहभाग झालेला असुन त्यामध्ये साडेचार वर्षांपासून ते ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडू सुद्धा या स्पर्धेमध्ये आपले बुद्धीचे बळ पणाला लावणार आहे. स्पर्धेला प्रतिसाद मिळाला असून सुरू खेळाडूचे स्वागत करत बुद्धिबळ खेळाडूंसाठी काहीतरी नवीन करण्याची ताकद अहिल्यानगर बुद्धिबळ संघटनेमध्ये असल्याचे नरेंद्र फिरोदिया यांनी सांगितले. अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने तीन दिवसीय चालणाऱ्या दुसरी नरेंद्रजी फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचे शुभारंभ जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया याच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन करण्यात आले. यावेळी संघटनेचे सचिव यशवंत बापट, नागनाथ हलकुडे, योगेश रवंदळे, पारुनाथ ढोकळे, सुबोध ठोंबरे, श्याम कांबळे, प्रकाश गुजराथी, नवनीत कोठारी, दत्ता घाडगे,



नरेंद्रजी फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन स्पर्धेचे बुद्धिबळ पटावर चाल देऊन शुभारंभ करताना नरेंद्र फिरोदिया.

स्वप्निल बंगूरकर, सुनील जोशी, विष्णू कुद्रे, संजय खडके, अनुराधा बापट, रोहिणी आडकर, शुभदा ठोंबरे, डॉ. स्मिता वाघ, पंच प्रवीण ठाकरे, शार्दुल टापसे, पवन राठी, सनी गुगळे, शिरीष इंदुरकर, देवेंद्र ढोकळे, प्रशांत धगेकर, गोरक्षनाथ पुंड, चेतन कड, मनीष जसवानी, शिवम ठाकुर, योगेश खंडाळे, वल्लभ कुलकर्णी, गजानन चिपळूणकर आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत बुद्धिबळ खेळण्यासाठी आतापर्यंत गुजरात, आंध्र प्रदेश, दिव, दमन, गोवा, तमिळनाडू, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, आंध्र प्रदेश, बिहार, गुजरात, हरियाणा, कर्नाटक, केरळ, पांडिचेरी, राजस्थान, तेलंगणा, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, ओरिसा, मध्य प्रदेश इत्यादी राज्यातून ४५० च्या वर खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केलेला आहे. या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धे चे गुरुपौर्णिमेचे औदित्य साधून नरेंद्र फिरोदिया यांनी बुद्धिबळा साठी दिलेला योगदानाला वंदन म्हणून त्यांच्या नावाची ही दुसऱ्यांदा स्पर्धा आयोजित केली असून या स्पर्धेमध्ये साडेचार वर्षाचा बाळ खेळाडू ते ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडू सुद्धा या स्पर्धेमध्ये आपले बुद्धीचे बळ पणाला लावणार असल्याचे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले.

सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले. खजिनदार सुबोध ठोंबरे यांनी आभार मानले. खेळाडू पालक प्रशिक्षक याने लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय संपूर्ण भरले होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. **सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असुन** त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाचे आत** खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळविता परस्पर वर्तमान पत्रातून जाहीर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. दिनांक –१९/०७/२०२५

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील, **मौजे माळीवाडा** येथील खालील वर्णनाची मिळकत –

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ७७ | १८ | २३६.५० चौ. मी. |

**हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील असलेले आरसीसी मधील ग्राऊंड फ्लोअरवरील असलेले बांधकाम क्षेत्र ७४.९१ चौ मी व फर्स्ट फ्लोअरवरील असलेले बांधकाम क्षेत्र १४५.२६ चौ.मी. व सेकंड फ्लोअरवरील असलेले बांधकाम क्षेत्र १४५. २६ चौ.मी. ही आहे त्या स्थितीतील संपूर्ण तदंगभूत वस्तूंसह मिळकत.**

यासी चतुःसिमा :
**पुर्वेस** : **पब्लिक ॲमिनीटी व प्लॉट नंबर २२**
**दक्षिणेस** : **प्लॉट नंबर १९**
**पश्चिमेस** : **६.०० मी. रुंदीचा रस्ता त**
**उत्तरेस** : **प्लॉट नंबर १७**

सदर मिळकतीचे विद्यमान मालक–
१.श्री.अशोक उत्तम चौधरी,
२.सौ.रत्नमाला अशोक चौधरी
दोघे रा. आयकॉन टॉवर, स्टेशन रोड, अहिल्यानगर (अहमदनगर).
दिनांक : १९/०७/२०२५, अहमदनगर

**ॲड.प्रणव सुधीर धर्माधिकारी**
**ॲड.सौ.नूतन प्रणव धर्माधिकारी**
मो : 9028008200
पत्ता : भंडारी सावज अपार्टमेंट, कोठीरोड, अहिल्यानगर (अहमदनगर)



# चांद सुलताना संस्थेच्या चेअरमन आदेशाला उच्च न्यायालयाची स्थगिती

नगर – चांद सुलताना शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदासंदर्भातील सहाय्यक धर्मदाय आयुक्तांच्या आदेशाला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने स्थगिती दिली आहे. संस्थेचे अपात्र सचिव शेख तनवीर चांद आणि निलंबित मुख्याध्यापक खान नासिर ख्वाजालाल यांनी खोटा चेंज रिपोर्ट सादर केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात शेख मुशाहिद लियाकत यांना चेअरमन म्हणून नियुक्त करण्यासाठी खोट्या सह्यांचा वापर करत बनावट वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त तयार केले गेले. शेख मुशाहिद यांनी आदेशाचा दुरुपयोग करून संस्थेत बेकायदा प्रवेश करून महत्वाचे दस्तऐवज आणि रोख रक्कम चोरल्याचा आरोप आहे. याविरोधात सय्यद अब्दुल मतीन आणि सहकाऱ्यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली. न्यायमूर्ती चपळगावकर यांनी खोट्या अजेंडा आणि प्रक्रियेचा आधार घेत आदेशाला स्थगिती दिली. ज्येष्ठ वकील तोतला भाऊसाहेब यांनी युक्तिवाद केला.



# ब्रिटिश पार्लमेंट, लंडन मध्ये डॉ. दीपक हरके एक्सलेंस अवॉर्डने सन्मानित

हाऊस ऑफ कॉमन्स, ब्रिटिश पार्लमेंट लंडन येथे जगभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना एक्सलेंस अवॉर्ड लंडन ऑर्गनायझेशन ऑफ स्किल्स डेव्हलपमेंटच्या वतीने गौरविण्यात आले. यामध्ये जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवा केंद्राच्या माध्यमातून नि:शुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांचा जगभरात भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रचार व प्रसार केल्याबद्दल खासदार बॉब ब्लॅकमन यांच्या हस्ते एक्सलेंस अवॉर्ड २०२५ ने सन्मानित करण्यात आले. यावेळी लंडन ऑर्गनायझेशन ऑफ स्किल्स डेव्हलपमेंटच्या सीईओ डॉ. परिन सोमाणी व गाम्बियाचे राजकुमार महामहिम इब्राहिम सान्यांग उपस्थित होते.

## तिळवण तेली समाज ट्रस्ट, अहिल्यानगर
श्री.विठ्ठल रुक्मीणी मंदिर, तेली समाज, पंच वाडा, अ.नगर

### जाहीर प्रकटनास खुलासा व हरकतीस उत्तर

जाहीर खुलासा व हरकतीस उत्तर देण्यात येत आहे येणे प्रमाणे तमाम तिळवण तेली समाज अहिल्यानगर बांधवाना व ट्रस्ट अ/४६३ ह्या न्यासाच्या संदर्भात श्री. प्रसाद अर्जुन शिंदे यांनी दिनांक १५/०७/२०२५ रोजी दैनिक नवा मराठा या वर्तमानपत्रात तिळवण तेली समाज ट्रस्ट अ.नगर अ/४६३ या न्यासाच्या सन २०२५ ते २०२८ या कालावधीसाठी विश्वस्तांची निवडणूक कामी जे काही चुकीचे जाहीर प्रगटन व खुलासा केला आहे तो मे.धर्मदाय उपआयुक्त अ.नगर या कोर्टाचा दि.११/०६/२०२५ चौकशी अर्ज ५६२/२०२५ मध्ये, दिलेल्या कोर्ट आदेशाचा मोठा आवमान करणारा आहे व खुलासा व हरकत जाहीर केलेला आहे. तो खोटा चुकीचा आहे व महानगर शहर हद्दीतील सर्व तेली समाज बांधवांची दिशाभूल करणारा आहे.

श्री.प्रसाद अर्जुन शिंदे व त्यांचे सर्व विश्वस्त मंडळ हे बेकायदेशीर व चुकीच्या पध्दतीने निवडलेले आहे. त्यांना धर्मादाय आयुक्त यांनी आजपर्यंत ट्रस्ट चालवण्याची परवानगी दिलेली नाही व काम करण्याचा कोणताही अधिकार दिलेला नाही तरीही देखील ते ट्रस्टचा कारभार आपल्या मर्जीप्रमाणे आर्थिक व्यवहार पाहत आहेत. स्थावर व जंगम मालमत्तेचा गैरवापर मोठया प्रमाणात करत आहेत. त्यामुळे न्यासाचे फार मोठे नुकसान झाले आहे व होत आहे.

त्यांनी मनगट/हुकुमशाही पध्दतीने ट्रस्टचे सर्व रेकॉर्ड व कागदपत्रे ताब्यात घेतली आहे. श्री.प्रसाद अर्जुन शिंदे हे आजपर्यंत न्यासाचे फायदेशीर ते कधीही विश्वस्त नव्हते आजपर्यंत नाही. दि.११/०६/२०२५ च्या कोर्टाच्या आदेशात दिलेले आहे. हरीभाऊ डोळसे दि.१२/०७/२०२५ रोजी दै.नवामराठा मध्ये जे जाहीर प्रगटन जाहीर केलेले आहे ते उपधर्मादायुक्त कार्यालय, अ.नगर यांचे कोर्ट आदेशाप्रमाणे योग्य निवडणुक प्रक्रियाचे कामकाज योग्य प्रकारे चालु करत आहे. कोणाचेही गैरसमज होऊ नये म्हणून हा खुलासा पुन्हा करत आहे व तेली समाजाची मतदान यादी तयार करण्याचे कामकाज चालु आहे. त्यामध्ये समाजाने भाग घेऊन सभासद यादीत कार्यालयीन वेळेत येऊन आपआपल्या नावाची नाव नोंदणी जास्तीत जास्त संख्येने करावी, कोणीही गैरसमज करुन घेउ नये भुल थापांना बळी पडु नये, हे समाजाचे हितकारक आहे. कोर्टाची आदेशीत निवडणुक घेण्याविषयाची आदेशाची अस्सल प्रत दफ्तरी माझ्याकडे उपलब्ध आहे कोणास पाहिजे असल्यास कार्यालयीन वेळेत ती पहावयास उपलब्ध आहे. श्री.हरीभाऊ बाबुराव डोळसे हे रेकॉर्डवर आजपर्यंत कायदेशीर विश्वस्त आहेत.

ता.१९/०७/२०२५
ठिकाण : अहिल्यानगर

**खुलासा करणार विश्वस्त**
**हरिभाऊ बाबुराव डोळसे**
**मो : ९८२२२७१८०७**



## नगरपंचायत कार्यालय ,कर्जत
ता.कर्जत,जि.अहिल्यानगर

फोन : ०२४८९–२२२०१२
न.प.कार्या/जा.क्र./१५५७/२०२५,
Email :-cokarjat55@gmail.com
दि.१८/०७/२०२५

### निविदा सूचना

मा.मुख्याधिकारी.नगरपंचायत कर्जत ता.कर्जत जि.अ.नगर.हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील कंत्राटदाराकडून कामाचे ऑफलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | विभागाचे तपशील | निविदा फॉर्म फी | निविदा बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कार्यालयीन कामकाजाकरिता कपाट व रॅक खरेदी करणे | ५००/– | २००० |
| २ | नगरपंचायत कार्यालयात CCTV बसविणे. | ५००/– | २००० |
| ३ | नवीन नगरपंचायत कार्यलयात विविध विभागात फर्निचर बसविणे | ५००/– | २००० |
| ४ | पाणीपुरवठा विभागाकरिता दुरुस्ती करिता साहित्य खरेदी करणे | ५००/– | २००० |
| ५ | खेड जॅकवेल येथील स्टॅण्डबाय विद्युतपंप तसेच फिल्टर प्लांट वरील विद्युतपंप एकवेळ दुरुस्त करणे | ५००/– | २००० |
| ६ | नगरपंचायत विद्युत विभागाकरिता स्ट्रीट लाईट व इतर साहित्य पुरवठा करणे | ५००/– | २००० |
| ७ | शारदा नागरी येथे नवीन पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे. | ५००/– | २००० |

| अ.क्र. | नगरपंचायत प्रक्रिया | दिनांकापासून | दिनांकापर्यंत |
|---|---|---|---|
| १ | ऑफलाईन निविदा विक्री | १९/०७/२०२५ पासून (सकाळ १०.०० पासून) | २५/०७/२०२५ पासून (सायं. ६.०० पर्यंत) |
| २ | ऑफलाईन निविदा स्वीकृती | १९/०७/२०२५ (सकाळ १०.०० पासून) | २५/०७/२०२५ पासून (सायं. ६.०० पर्यंत) |
| ३ | मूळ कागदपत्र सादर करणे | २५/०७/२०२५ (सकाळ १०.०० पासून) | २५/०७/२०२५ पासून (सायं. ६.०० पर्यंत) |

१) कामाच्या सर्व अटी शर्ती निविदा संचासोबत उपलब्ध आहेत. २) कोणतीही निविदा स्वीकारणे नाकारणे अथवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार नगरपंचायतीस राहतील.

**नगराध्यक्षा कर्जत नगरपंचायत कर्जत**
**उपनगराध्यक्ष कर्जत नगरपंचायत कर्जत**
**मुख्याधिकारी कर्जत नगरपंचायत कर्जत**



## जाहीर नोटीस

या नोटिशीद्वारे जाहीर करण्यात येते की, भारती विठ्ठल दवे, वय–३३ वर्षे, धंदा–गृहिणी, राहणार–सदर बाजार, भिंगार, अहिल्यानगर यांनी घर नं. १२४ सर्व्हे नं. २१३/१०८ सदरबाजार.

अहमदनगर छावनी परिषद हे (१) रजिस्टर खरेदीखत क्र. १०७५४/२०२४ दिनांक २९/११/२०२४ (२) रजिस्टर चुक दुरुस्ती लेख क्र. ११५०५/२०२४, दिनांक २३/१२/२०२४ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहमदनगर यांचेकडे तसे लेखी कळवावे. सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतींवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घ. नं. १२४,सदर बाजार
क्षेत्रफळ : २१९.०० चौ.फुट
छावनी परिषद कार्यालय,अहमदनगर
१४/०७/२०२५

**कार्यालय अधिक्षक**
**कृते मुख्य अधिशासी अधिकारी,**
**अहमदनगर छावनी परिषद**
**(विक्रांत मोरे)**



## जाहीर नोटीस

या जाहीर नीटीसद्वार कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार,मदार,मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्राचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १९/०७/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन : १) मिळकत वर्णन :** जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, मौजे **शहरनगर** येथील पुढील वर्णनाची मिळकत –

| सि.स.नं. | क्षेत्र |
|---|---|
| ७३८४/३+४ | ७१६.०० चौ.मीटर |

**यांसी चतुःसीमा–**
पूर्वेस : बालीकाश्रम रोड, दक्षिणेस : रोड
पश्चिमेस : सि.स.नं. ७३८४/५ व ७३८४/६ उत्तरेस सि.स.नं. ७३८४/२

यावर बांधलेल्या इमारतीचे नाव–**शिवपार्वती अपार्टमेंट यापैकी दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २०२ चे क्षेत्र (बिल्टअप ) ८७.१४ चौ.मी (९३८.०० चौ.फुट)(सदर अपार्टमेंटच्या जमीनीत घेणार यांचा ८.७८% अविभक्त हिस्सा राहील.) यांसी चतुःसीमा** –
पूर्वेस : ४.५० मीटर रुंदीचा सेट बॅक दक्षिणेस ३.०० मीटर सेट बॅक
पश्चिमेस : फ्लॅट नं. २०१ उत्तरेस फ्लॅट नं. २०३ पॅसेज व जीना

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक–**
**जावेद खुर्शीद शेख**
ता.१९/०७/२०२५.
अहिल्यानगर

**ॲड.ए.जे.शेख**
बीएसएल,एलएलबी, रजि.नं.एमएच/२३०९/२०१३
ऑफिस : पराग बिल्डींग, कलेक्टर कचेरीशेजारी, अहमदनगर



## उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर भाग अहिल्यानगर यांचे कार्यालय, जिल्हा अहिल्यानगर महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील पद भरतीसाठी जाहिरात २०२५

### जाहिरातीचे शुध्दीपत्रक

अहिल्यानगर जिल्ह्यातील अहिल्यानगर उपविभागातील अहिल्यानगर तालुक्यातील सजेतील महसूल सेवक (कोतवाल) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता अर्हता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच https://nagar.govbharti.org या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत. यापूर्वी दिनांक ०७/०७/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार अर्जदार यांचेकडून अर्ज मागविणेची शेवटची तारीख दिनांक १८/०७/२०२५ रात्री (२३.५९) नमुद करण्यात आलेली होती. सदरची अर्ज भरणेकामीची मुदतवाढ देऊन ऑनलाईन अर्ज भरणेची अंतिम मुदत दिनांक २५/०७/२०२५ रोजी रात्री (२३.५९) पर्यंत करण्यात आलेली आहे.

तसेच दिनांक ०७/०७/२०२५ रोजीच्या जाहीरातीमध्ये नमुद करण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार
अर्जदार यांनी ज्या सजेतील पदासाठी अर्ज सादर केलेला आहे. त्या सजेतील अंतर्भूत असलेल्या गावांमधील अर्जदार रहिवासी असणे आवश्यक आहे, असे नमुद केलेले आहे.

**त्याऐवजी अर्जदार यांना गावातील स्थानिक परिस्थिती माहिती असणे आवश्यक आहे आणि त्यांच्या**
**नियुक्तीच्या गावात राहण्याची तयारी पाहिजे असे समाविष्ट करण्यात यावे.**

स्वाक्षरी/–
**सदस्य सचिव,**
**कोतवाल भरती निवड समिती तथा**
**तहसिलदार अहिल्यानगर**

स्वाक्षरी/–
**अध्यक्ष**
**कोतवाल भरती निवड समिती तथा,**
**उपविभागीय अधिकारी,**
**अहिल्यानगर भाग अहिल्यानगर**



## तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालय नवीन प्रशासकीय इमारत टी.व्ही. सेंटर समोर सावेडी, अहिल्यानगर

### कोतवाल भरतीचा सुधारित कालबध्द कार्यक्रम


| अ.क्र. | तपशील | दिनांक | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | जाहिरात प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक : ०७/०७/२०२५ | |
| २ | ऑनलाईन पध्दतीने फॉर्म स्विकारण्याचा दिनांक | पासून ०८/०७/२०२५ | पर्यंत २५/०७/२०२५ |
| ३ | ऑनलाईन पध्दतीने परिक्षा शुल्क जमा करण्याच्या अंतिम दिनांक | दिनांक : २५/०७/२०२५ (रात्री २३.५९ वा.पर्यंत) | |
| ४ | परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | पासुन २८/०७/२०२५ | पर्यंत ०९/०८/२०२५ |
| ५ | प्रत्यक्ष परिक्षेचा दिनांक व वेळ | १०/०८/२०२५ (रविवार) सकाळी ११.०० वा. ते १२.०० | |
| ६ | प्रारुप उत्तरपत्रिका प्रसिध्दी | दिनांक १०/०८/२०२५ वेळ दु. १२.३० | |
| ७ | प्रारुप उत्तर तालिकेवरील हरकती स्वीकारणे | दिनांक १०/०८/२०२५ वेळ दु. १२.३० ते २.३० | |
| ८ | अंतिम उत्तरतालिका प्रसिध्दी | दिनांक १०/०८/२०२५ वेळ दु. ०४.०० | |
| ९ | अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्दी | दिनांक ११/०८/२०२५ | |
| १० | कागदपत्रे छाननी व अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे व पात्र उमेदवारास आदेश देणे. (उपविभागीय अधिकारी यांचे स्तरावर) | दिनांक १८/०८/२०२५ | |

स्वाक्षरी/–
**सदस्य सचिव,**
**कोतवाल भरती निवड समिती तथा**
**तहसिलदार अहिल्यानगर**

स्वाक्षरी/–
**अध्यक्ष**
**कोतवाल भरती निवड समिती तथा,**
**उपविभागीय अधिकारी,**
**अहिल्यानगर भाग अहिल्यानगर**

# निरामय

## झोपेनंतरही आळस येतोय?



जाणून घ्या

डॉ. कुंदन गायकवाड

रात्रीचे चांगले झोपूनही दिवस आळसात जात असल्याची अनेकांची तक्रार असते. मग कामाच्या ठिकाणी डुलक्या काढाव्या लागतात. शरीराला थकवा जाणवतो. कोणत्याही कामात लक्ष लागत नाही. सारखी डोळ्यावर झापड येते. असे होत असेल तर याकडे दुर्लक्ष करु नका. ही लक्षणे एका गंभीर समस्येचे संकेत असू शकतात.

* **हायपर सोम्निया:** रात्रीच्या जागरणानंतर दिवसा झोप येणे ही सामान्य बाब आहे. परंतु रात्री नीट झोपल्यानंतर दिवसा सारखा आळस येत असेल तर हा प्रकार हायपरसोम्निया असू शकतो.

* **मद्य:** जास्त मद्यपान केल्याने झोपेवर परिणाम होतो. त्यामुळे दिवसभर झोप येऊ शकते.

* **स्नायू कमजोर:** शरीरातील स्नायू कमजोर असतील, तर वारंवार झोप येऊ शकते.

* **रात्रीची नीट झोप न येणे:** अनेकांना रात्रीची झोप येत नाही. त्यामुळे रात्री बिछान्यात तळमळत पडावे लागते. याने हायपरसोम्नियाचा धोका आणखी वाढतो.

* **औषधाचे साईड इफेक्ट:** अनेकदा औषधांच्या साईड इफेक्टमुळे हायपरसोम्नियाचा त्रास होऊ शकतो. यामुळे दिवसा झोप अधिक येते.

* **मधुमेह:** मधुमेह झाल्यानंतर शरीरात साखरेचे प्रमाण वाढले तर हायपरसोम्नियाचा त्रास वाढू शकतो. मधुमेहामध्ये शरीर ग्लुकोजचे ऊर्जेत रुपांतर करण्यात असमर्थ असते. यामुळेही दिवसाचा थकवा आणि झोप येते. वारंवार तहान लागणे आणि लघवीला येणे, वजन कमी होणे ही याची लक्षणे आहेत.


* **थायरॉईड:** हायपोथायरायडिज्ममध्ये थायरॉईड ग्रंथी प्रभावित होतात. यामुळे सुस्ती, थकवा आणि वारंवार झोप येण्याची समस्या वाढते. वजन वाढणे, थंडी वाजणे आणि केस गळणे याचे लक्षण आहे.

* **ॲनीमिया:** ॲनिमियामध्ये हिमोग्लोबीन कमी असल्याने शरीरात ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो. त्यामुळे थकवा आणि झोपेची समस्या वाढू शकते.

**काय आहेत लक्षणे ?**

* ॲंग्झायटी आणि स्ट्रेस * चिडचिडेपणा * दिवसभर चिडचिडपणा * शरीर थकलले वाटणे * सर्व गोष्टींवर राग येणे * सकाळी झोपेतून उठूच नये असे वाटणे * डोकेदुखी * भूख न लागणे * वारंवार एखादी गोष्ट विसरणे * बेचैन झाल्यासारखे वाटणे * एकाग्रता करताना अडचण येणे

## आणखी एक रक्तगट!




नवे काही

डॉ. नीता पाटील

आतापर्यंत तुम्ही अनेक रक्तगटांबाबत ऐकले असेल. मात्र शास्त्रज्ञांनी एक नवा रक्तगट शोधून काढला आहे. याचे नाव 'ग्वाडा निगेटिव्ह' असे ठेवण्यात आले आहे. शास्त्रज्ञांना एका महिलेमध्ये हा नवीन आणि अत्यंत दुर्मिळ रक्तगट सापडला आहे.

प्रत्येक व्यक्तीचा एक रक्तगट असतो. मात्र आता अजून एक नवा रक्तगट समोर आला आहे. विशेष म्हणजे हा रक्तगट आजवर फक्त एका महिलेमध्येच आढळला आहे! या महिलेच्या रक्तगटाशी एकूण ४७ पैकी एकही रक्तगट मॅच होत नाही. त्यामुळे यासोबत संबंधित उपचार करणे फारच कठीण मानले जाते.

फ्रान्समधील संशोधकांनी हा नवीन रक्तगट शोधून काढला आहे. संशोधकांनी या रक्तगटाला 'अल्ट्रा रेअर' म्हणजेच 'अत्यंत दुर्मीळ' म्हणून घोषित केले आहे. या रक्तगटाची नोंद ग्वाडेलूप बेटावर राहणाऱ्या एका महिलेच्या शरीरातून झाली आहे.

वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार हा आतापर्यंतचा ४८वा ओळखलेला ब्लड ग्रुप आहे.

फ्रान्सच्या इएफएस रक्तपेढीने या रक्तगटाला ग्वाडा निगेटिव्ह असे नाव दिले आहे.

आत्तापर्यंत हा जी निगेटिव्हव रक्तगट असलेली ही एकमेव रुग्ण (महिला) आहे. या रक्तगटाचा शोध खरेतर २०११ सालीच सुरू झाला होता. त्या वेळी या ५४ वर्षीय महिलेची एक शस्त्रक्रिया होणार होती आणि त्यासाठी रक्ताची गरज होती. मात्र आश्चर्य म्हणजे कोणत्याही रक्तदात्याचे रक्त तिच्या रक्ताशी जुळत नव्हते. त्यामुळे डॉक्टरांनी तिचे हिमोग्लोबिन वाढवण्याचे वेगळे प्रयत्न सुरू केले. याच दरम्यान तिच्या रक्तात एक खूपच वेगळ्या प्रकारची ॲंटीबॉडी आढळून आली. हे काहीतरी वेगळे असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले.

रक्तगट केवळ रक्त देतानाच नाही तर अवयव प्रत्यारोपण आणि काही विशिष्ट आजार ओळखण्यासही महत्त्वाचा ठरतो. योग्य रक्तगट न मिळाल्यास रुग्णाचा जीवसुद्धा जाऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक नव्या रक्तगटाचा शोध वैद्यकीय क्षेत्रासाठी खूप महत्त्वाचा असतो. अमेरिकेतील सीडीसी (सेंटर फॉर डिसीज कंट्रोल ॲंड प्रिव्हेन्शेशन) या आरोग्य संस्थेनुसार अमेरिकेत दरवर्षी जवळपास १.४ कोटी युनिट्स रक्त देण्यात येते. त्यामध्ये ए, बी, ओ हे सर्वसामान्य गट असले तरी जगात अनेक दुर्मीळ रक्तगट सुद्धा आढळले आहेत. आता या नव्या ब्लड ग्रुपचीही इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्युजनने अधिकृत नोंद घेतली आहे.

## मांजरामुळे होतो स्किझोफ्रेनिया?



आरोग्यवेध

डॉ. दिलीप शिरसाट

घरात कुत्रा किंवा मांजर पाळणे अनेकांना आवडते. या पाळीव प्राण्यांचा घरच्यांना चांगलाच लळा लागतो. अगदी त्यांना घरातील व्यक्तीसारखीच वागणूक दिली जाते. त्यांचे खाणे, फिरणे यांच्याकडे कटाक्षाने पाहिले जाते. पाळीव प्राण्यांमुळे मानसिक आरोग्य चांगले राहते.

मात्र मांजरांबाबत एक धक्कादायक, आश्चर्यकारक संशोधन समोर आले आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठातले मांजरांबाबतचे एक संशोधन समोर आले आहे. या संशोधनानुसार पाळीव प्राण्यांमुळे काही आजार होतात.

मांजरामुळे स्किझोफ्रेनिया हा मेंदूचा गंभीर आजार होऊ शकतो. अमेरिकेत १० ते ३० टक्के लोक एका स्किझोफ्रेनिया आजाराने संक्रमित आहेत. कमी शिजवलेले मांस खाल्ल्याने किंवा मांजरीच्या विष्ठेच्या संपर्कात आल्याने स्किझोफ्रेनिया होतो. स्किझोफ्रेनिया मेंदूवर गंभीर परिणाम होतो, त्यामुळे नैराश्यात जाऊ शकता किंवा विस्मरणासासारखा आजार होऊ शकतो.

*** स्किझोफ्रेनिया मांजरींमधून कसा पसरतो?**

संशोधकांच्या मते, टॉक्सोप्लाझ्मा गोंडी हा परजीवी मांजरींपासून मानवापर्यंत पोहोचू शकतो. यामुळे मानवांमध्ये स्किझोफ्रेनिया विकसित होऊ शकतो. संशोधकांच्या मते टॉक्सोप्लाइमा गोंडी थेट मेंदूच्या न्यूरोट्रांसमीटरवर परिणाम करू शकतात आणि सूक्ष्म अल्सर तयार करू शकतात. संशोधकांच्या पथकाने १७ अभ्यासांचा आढावा घेतला. त्यानंतरच हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. गेल्या ४४ वर्षांत अमेरिका आणि ब्रिटनसह ११ देशांमधील विद्यमान संशोधनातील डेटाचे विश्लेषण केले आहे. त्यांना २५ वर्षांपूर्वी मांजरींच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना स्किझोफ्रेनिया होण्याची शक्यता जवळजवळ दुप्पट असते, असे आढळले.

## लाभदायी कटुकी



आयुर्वेद आणि विकार

कटुकी ही एक आयुर्वेदिक वनौषधी आहे. डोंगराळ भाग तसंच पर्वतरांगांमध्ये आढळणारी कटुकी ही अत्यंत दुर्मीळ वनौषधी मानली जाते. औषधी गुणधममुळे आयुर्वेदिक औषधांमध्ये कटुकीचा वापर केला जातो. कडवट चव असणाऱ्या कटुकीच्या गुणधर्मांविषयी...

* वजन कमी करायचं असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्याने कटुकीचं सेवन करता येईल. कटुकीमुळे पचनशक्ती सुधारते. तसंच चयापचय क्रियेची गती वाढल्यामुळे वजन कमी व्हायला मदत होते.

* कटुकीमध्ये दाह कमी करणारे गुणधर्म असतात. सध्याच्या वातावरणात खराब हवा आणि प्रदूषणामुळे अस्थमा तसंच श्वसनाचे विकार असणाऱ्यांना श्वास घ्यायला त्रास होतो. अशा वेळी कटुकीच्या सेवनामुळे लाभ होऊ शकतो. अस्थमाच्या रुग्णांसाठी कटुकी लाभदायी ठरू शकते.

* ताप आल्यावर तुम्ही एखादी गोळी घेऊन झोपता. मात्र अश वेळी कटुकीचं सेवन करता येईल. कटुकीमुळे ताप उतरायला मदत होते. कटुकीची पूड करून पाण्यासोबत घेता येईल. कटुकीमुळे रोगप्रतिकारक शक्ती सुधारते आणि सर्दी, खोकला, ताप अशा आजारांपासून बचाव होतो.

## बुरशीपासून करा बचाव



व्याधी विचार

डॉ. महेश दळे

पावसाळ्यातील आर्द्रतेमुळे या ऋतूत अनेक आजार होण्याची भीती असते आणि अनेकांना त्वचेशी संबंधित समस्याही उद्भवू लागतात. बुरशीजन्य संसर्ग म्हणजेच 'फंगल इंफेक्शन' टाळण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

पावसाळ्यात त्वचचे संसर्ग होण्याचे प्रमाण खूप वाढते. त्यामुळे या ऋतूत काही गोष्टी आधीच लक्षात ठेवल्या तर हे संसर्ग टाळता येतात.


त्वचेचे संसर्ग टाळण्यासाठी त्वचा स्वच्छ आणि कोरडी ठेवणे खूप महत्वाचे आहे. आंघोळ केल्यानंतर ताबडतोब टॉवेलने अंग पुसून घ्या आणि मान, पाय आणि काखेच्या भागाच्या स्वच्छतेची विशेष काळजी घ्या. घाम आल्यावर टॅल्कम पावडर वापरा आणि त्वचा सुती कापडाने पुसून घ्या.

तुम्ही पावसात भिजला असाल तर त्यानंतर घरी गेल्यावर लगेच साध्या पाण्याने आंघोळ करा. पावसात भिजल्यानंतर डोके स्वच्छ करा. ओल्या कपड्यांमध्ये जास्त वेळ राहू नका. त्यामुळे पुरळ आणि मुरुम यासारख्या समस्या उद्भवतात.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये कामावरून किंवा इतर कुठूनही घरी आल्यावर लगेच घरामध्ये वावरू नका. त्याआधी येऊन हातपाय धुवा. विशेषतः पादत्राणे ओली झाली तर स्वच्छतेची विशेष काळजी घ्या. कारण पावसाळ्यात पायांच्या बोटांमध्ये त्वचेचा संसर्ग होण्याचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो.

बरेचदा पावसात कपडे दमट राहतात. त्यामुळे असे कपडे घालणे टाळा. तुमचे कपडे, टॉवेल इत्यादी योग्यरित्या उन्हात ठेवा. विशेषतः अंतर्वस्त्रे फक्त उन्हात वाळवा. तुम्हाला कोणत्याही प्रकारच्या त्वचेच्या समस्येचा सामना करावा लागत असेल तर स्वतःच औषधे घेण्याऐवजी त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घ्या .

## असेही फोबिया



आरोग्यवेध

प्रत्येकालाच कशाची तरी भीती वाटते. काहीजण विमानात बसायला घाबरतात. काहींना एकटेपणाची तर काहींना अंधाराची भीती वाटते. पाली, झुरळ यांना घाबरणाऱ्यांची संख्याही कमी नाही. याच भीतीला वैद्यकीय भाषेत फोबिया म्हणतात. काहींना ठराविक गोष्टींची भीती वाटते. ही भीती इतकी तीव्र असते की त्यांना काहीच करता येत नाही. या भीतीमुळे व्यक्तीच्या दैनंदिन आयुष्यावर परिणाम होतो. विविध प्रकारचे फोबिया नेहमीच चर्चेत असतात. जीवनशैलीतले बदल तसंच इतर काही कारणांमुळे या भीतीत भर पडत चालली आहे. फोबियांचे प्रकार बदलत आहेत. फोबियाच्या नव्या प्रकारांचा शोध लागला आहे. त्याविषयी...

* इको-एंग्झायटी हा प्रकार सध्याच्या काळात नवा आहे. पर्यावरणाच्या हानीबद्दलच्या बातम्या सतत येत असतात. पृथ्वीचं वाढतं तापमान, वितळणारा बर्फ,जंगलांना लागणाऱ्या आगी यामुळे पृथ्वीवरची जीवसृष्टी धोक्यात आली आहे, असा अनेकांचा समज होतो. अनेकांच्या मनात हवामानबदलाच्या दुष्परिणामांची भीती बसली आहे. त्यातही तरुणांना आपल्या भविष्याची खूप काळजी वाटते. हवामानबदलाचा विचार समोर आला की अनेकजण घाबरू लागतात. यालाच इको-एंग्झायटी असं म्हटलं जातं.


* सध्याच्या काळात स्मार्टफोनशिवाय जगणं अशक्य झालं आहे. प्रत्येकाला हातात स्मार्टफोन लागतो. स्मार्टफोनपासून दूर रहाणं अनेकांना सहन होत नाही. याला नोमोफोबिया असं म्हटलं जातं. यात फोन जवळ नसला की अस्वस्थता जाणवते. सतत मोबाईल फोनचा विचार करणं, फोन घरी विसरल्यावर आलेले मेसेज तसंच मिस्ड कॉलबद्दल विचार करत राहणं म्हणजे नोमोफोबिया. या फोबियाचं प्रमाण वाढत चाललं आहे.

* फूड निओफोबियाचं प्रमाणही वाढत चाललं आहे. या प्रकारच्या फोबियामध्ये एखादा नवा पदार्थ खाऊन बघण्याबाबत प्रचंड अस्वस्थता जाणवते. लहान मुलांमध्ये हा फोबिया आढळतो.

* सध्या फॅड डाएट्सचं प्रमाण वाढलंय. बारीक राहण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. कर्बोदकांच्या सेवनामुळे वजन वाढतं, असंही बोललं जातं. कर्बोदकांमुळे वजन वाढण्याची भीती कार्बोफोबियाला जन्म देते. म्हणूनच अनेकांना कर्बोदकं खाण्याची प्रचंड भीती वाटते.

* एडिटिओव्हल्टा फोबिया हे नाव सहसा कोणी ऐकलं नसेल. हे भलं मोठं नाव ऐकून कोणालाही धक्का बसेल. सोशल मीडियाची भीती म्हणजे एडिटिओव्हल्टा फोबिया. आपण सतत कोणाच्या तरी नजरेत आहोत, सोशल मीडियामुळे अनेकजण आपलं निरिक्षण करत असतील असे विचार यामुळे मनात येऊ लागतात. म्हणूनच सोशल मीडियापासून लांब रहायला हवं.

## ...म्हणून वाढतो ताण



कुठे चुकतो आपण?

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात ताणतणावांपासून कोणीही सुटत नाही. प्रचंड काम, प्रवास, घराची जबाबदारी यामुळे ताण वाढतोच. शिवाय आपल्या काही सवयींमुळेही ताणात भर पडते. कोणत्या आहेत या सवयी? जाणून घेऊ.


* काही लोक छोट्या छोट्या गोष्टींचा अतिविचार करतात. या अतिविचारामुळे ताणात भर पडते. अतिविचारावर नियंत्रण मिळवता येतं. मनात कोणत्याही चुकीच्या विचारांना थारा देऊ नका. वर्तमानात जगा. भूतकाळ तसंच भविष्याचा फार विचार करू नका.

* माणसाला शांत झोपेची गरज असते. पुरेशी झोप मिळाली की दिवस उत्साहात सुरू होतो. अपुऱ्या झोपेमुळे मात्र खूप चिडचिड होते. ताण वाढतो. त्यामुळे दररोज किमान सहा ते आठ तासांची झोप घ्यायला हवी.

* अव्यवस्थितपणामुळेही ताण वाढतो. घरात किंवा ऑफिस डेस्कवर खूप पसारा असेल तर ताणात भर पडते. हा ताण कमी करण्यासाठी प्रत्येक वस्तू जागेवर ठेवा. घर आवरून ठेवा. उगाचच पसारा करू नका.

* स्मार्टफोन हा सुद्धा ताणात भर घालणारा घटक आहे. त्यामुळे स्मार्टफोन, सोशल मीडिया यांचा वापर मर्यादितच करायला हवा. स्मार्टफोन वापरावर नियंत्रण आणा. गरज वाटल्यास नोटिफिकेशन्स बंद करा. झोपण्याआधी काही काळ स्मार्टफोन बाजूला ठेवा. यामुळे तुमचा ताण कमी व्हायला मदत होईल.

## किडनीविकार ओळखा



आरोग्यचर्चा

डॉ. अजय गर्जे

किडनीला शरीराचे फिल्टर मशीन म्हटले जाते. कारण किडनी रक्त स्वच्छ करते, शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकते आणि पाणी-सोडियम संतुलन राखते. किडनीने काम करणे थांबवले तर शरीराला गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागू शकते.

किडनी निकामी होण्याआधी लक्षणे

किडनी खराब होण्याची सुरुवातीची लक्षणे

* सतत थकवा आणि अशक्तपणा जाणवणे: किडनी रक्त योग्यरित्या स्वच्छ करू शकत नसेल, तर शरीरात टाकाऊ पदार्थ जमा होऊ लागतात, त्यामुळे शरीर सुस्त आणि कमकुवत वाटते.

* चेहरा, पाय आणि घोट्यांवर सूज येणे: मूत्रपिंड अतिरिक्त द्रव काढून टाकू शकत नाहीत तेव्हा ते शरीरात जमा होऊ लागते. यामुळे चेहऱ्यावर सूज येते, घोटे सुजतात आणि बूट घट्ट होतात.

* लघवीमध्ये बदल: रात्री वारंवार लघवी होणे, लघवीत रक्त येणे, जळजळ होणे किंवा दुर्गंधी येणे. ही सर्व लक्षणे किडनी व्यवस्थित काम करत नसल्याचे संकेत दर्शवतात.

* लक्ष केंद्रित करण्यात अडचण आणि चिडचिड: शरीरात विषारी पदार्थ वाढतात तेव्हा त्याचा मेंदूवरही परिणाम होतो. त्यामुळे निद्रानाश, मूड स्विंग, चिडचिडेपणा आणि लक्ष केंद्रित करण्यात अडचण येऊ शकते.

* मळमळ, उलट्या आणि भूक न लागणे: शरीरात विषारी घटक वाढतात तेव्हा ते पोटावर परिणाम करतात. परिणामी भूक लागत नाही, मळमळ किंवा उलट्या होतात. हळूहळू वजनदेखील कमी होऊ लागते.

**किडनी निरोगी ठेवण्यासाठी टिप्स**

* उच्च रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रणात ठेवा * भरपूर पाणी प्या (पण जास्त पाणी पिऊ नका) * धूम्रपान आणि मद्यपानापासून दूर रहा * डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वेदनाशामक आणि ॲंटीबायोटिक्स घेऊ नका.

* दर ६-१२ महिन्यांनी आरोग्य तपासणी करा.

### नवसंशोधन

**धूम्रपानामुळे**



धूम्रपानामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल आपण जाणतो. धूम्रपानामुळे शारीरिक आरोग्य धोक्यात येतच, शिवाय मानसिक आरोग्यावरही दुष्परिणाम होतात. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. धूम्रपान, नैराश्य आणि चिंता यांच्यातला परस्परसंबंध दाखवून देणारा शोध नुकताच प्रसिद्ध झाला आहे. म्हणजे धूम्रपानामुळे आपलं मानसिक आरोग्य धोक्यात येऊ शकतं. धूम्रपान करणारे लोक नैराश्याला बळी पडण्याची शक्यता दुपटीने अधिक असल्याचं या संशोधनातून समोर आलं आहे. यामुळे धूम्रपानाचं प्रमाण कमी करणं गरजेचं आहे.

### दंतारोग्य

**मुलांचे दात येताना**



दात येणं हा प्रत्येक बाळाच्या शारीरिक जडणघडणीतला महत्त्वाचा टप्पा मानला जातो. काही मुलं दात येण्याच्या प्रक्रियेतून सहज तरून जातात तर काही मुलांना खूप त्रास होतो. दात येण्याआधी काही मुलांच्या हिरड्या सुजतात. काहींना हिरड्यांमध्ये वेदना जाणवतात. यामुळे बाळ अस्वस्थ होतं. म्हणूनच या काळात मुलं रडतात, चिडचिड करतात. त्यांना भूक लागत नाही. काही मुलं झोपतही नाहीत. त्यामुळे या काळात मुलांची विशेष काळजी घेणं गरजेचं आहे.

### जपणूक त्वचेची


**वय वाढल्याच्या खुणा...**



वय वाढल्याच्या खुणा त्वचेवर दिसू लागतात. खाद्यतेलापासून आहारातले विविध घटक त्वचेच्या आरोग्यावर परिणाम करतात. वय वाढल्याच्या खुणांमुळे त्वचा निस्तेज दिसू लागते. आपली त्वचा नैसर्गिक तजेला हरवून बसते. यामुळे हाडं आणि नसा दिसू लागतात. ही समस्या दूर करण्यासाठी भरपूर पाणी प्या. ग्रीन टीमुळेही त्वचेला तजेला मिळू शकतो. पोषक आहार, फळांचं सेवनही उपयुक्त ठरू शकतं. चिया सीड्स तसंच ॲव्हाकॅडोमुळेही त्वचेला आवश्यक पोषण मिळतं.

### आजीबाईचा बटवा

**लाभदायी मखाणे**



मखाणे खूप आरोग्यदायी आहेत. त्याच्या नियमित सेवनामुळे विविध प्रकारच्या आजारांपासून मुक्ती मिळू शकते. मखाण्यांमध्ये फॅट्सचं प्रमाण बरंच कमी तर फायबरचं प्रमाण बरंच जास्त असतं. सोडियमही बरंच कमी असतं. सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी मखाणे खाल्ल्यामुळे रक्तातली साखर नियंत्रणात राहू शकते. मखाणे हृदयाच्या आरोग्यासाठीही चांगले आहेत. यासोबतच बद्धकोष्ठता, निद्रानाश अशा विकारांवरही ते उपयुक्त ठरतात.





जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केंद्र पुरस्कृत जिल्हा विकास समन्वय व नियंत्रण (दिशा) समितीच्या बैठकीत अध्यक्षस्थानी बोलताना खा. भाऊसाहेब वाकचौरे. समवेत निलेश लंके, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी. शेजारील छायाचित्रात उपस्थित असलेले समितीचे पदाधिकारी

# केंद्रपुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करुन योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा

### खासदार भाऊसाहेब वाकचौरे व खासदार निलेश लंके यांचे निर्देश

नगर – सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी राबवल्या जाणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी समन्वय व सकारात्मक दृष्टीकोनातून प्रभावीपणे करावी, असे निर्देश खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी दिले. तर योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी अधिकाऱ्यांनी संवेदनशीलपणे काम करा, असे आवाहन खासदार निलेश लंके यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केंद्र पुरस्कृत जिल्हा विकास समन्वय व नियंत्रण (दिशा) समितीच्या बैठकीत अध्यक्षस्थानी बोलताना श्री. वाकचौरे यांनी मार्गदर्शन केले. बैठकीस सहअध्यक्ष खासदार निलेश लंके, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, सदस्या सुनीता भांगरे, प्रकल्प संचालक राहुल शेळके उपस्थित होते.

खासदार वाकचौरे म्हणाले, रोजगार हमी योजनेतून बेरोजगारांना शाश्वत रोजगार मिळावा यासाठी निधीचा पुरेपूर वापर करावा. प्रत्येकाला हक्काचे घर मिळावे, यासाठी घरकुल योजना अधिक जोमाने राबवावी. महावितरणशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचे निवारण करण्यासाठी स्वतंत्र बैठक घ्यावी. जिल्ह्याला सोलरयुक्त करण्यासाठी सोलर योजनेत गती द्यावी. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील कामांची गुणवत्ता चांगली राहावी, याकडे लक्ष द्यावे. अंत्योदय योजनेत लाभार्थ्यांना पुरेसे धान्य व शिधापत्रिका मिळाल्याची खात्री करावी.

योजनांचे उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करून लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवाव्यात. यासाठी तालुका स्तरावर मेळावेही घ्यावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

खासदार निलेश लंके म्हणाले, कृषी विभागाच्या योजना तातडीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवाव्यात. ठिबक, स्प्रिंकलर, कांदाचाळ आदींच्या अनुदानाची रक्कम थेट खात्यावर जमा करावी. मागेल त्याला सोलर योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळावा व हयगयी करणाऱ्या एजन्सींवर कारवाई करावी.

ग्रामीण भागातील रोहित्र त्वरित दुरुस्त करून नागरिकांचा त्रास कमी करावा. स्वस्त धान्य दुकानांवरील कारवाई नियमाप्रमाणे व्हावी. पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा पाठपुरावा करावा.

शाळांतील पोषण आहार व रुग्णालयातील सेवा दर्जेदार ठेवाव्यात. महापालिकेची कामे वेळेत पूर्ण करावीत व गणेशोत्सवापूर्वी शहरातील रस्त्यांची दुरुस्ती व्हावी, असे निर्देशही श्री. लंके यांनी दिले.

बैठकीस सर्व संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# लोकमाता अहिल्यादेवी होळकर जीवन गौरव पुरस्काराने अहिल्यानगर जिल्ह्यातील जालिंदर बोरुडे यांचा सन्मान

### मोफत नेत्र शिबिर व नेत्र दान चळवळीतील कार्याची दखल



नगर – फिनिक्स सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांना यशवंत सेना आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने लोकमाता अहिल्यादेवी होळकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शहरात नुकताच झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात यशवंत सेनेचे सरसेनापती माधव गडदे यांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी यशवंत सेनेचे शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर, जिल्हाध्यक्ष विजय तमनर आदी उपस्थित होते.

जालिंदर बोरुडे फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या ३२ वर्षापासून शिबिर घेऊन हजारो गोरगरीब नेत्रदोष असलेल्या रुग्णांना मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया घडवून आणल्या असून, या सेवेच्या माध्यमातून अनेकांना नवदृष्टी मिळाली आहे. तर नागरिकांना मरणोत्तर नेत्रदानासाठी प्रोत्साहित करुन अनेकांचे मरणोत्तर नेत्रदान घडवून आनले आहे. नेत्र शिबिराबरोबरच समाजाची गरज ओळखून विविध आरोग्य शिबिर फाऊंडेशनच्या माध्यमातून ते घेत आहे. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना लोकमाता अहिल्यादेवी होळकर जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.



जालिंदर बोरुडे यांचा लोकमाता अहिल्यादेवी होळकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

# राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनास टाळाटाळ

### कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाचे अहिल्यानगर जिल्ह्यातील दोन्ही खासदारांना निवेदनाद्वारे साकडे




राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचाऱ्यांच्या समायोजन, मानधन वाढ प्रश्नांबाबत निवेदन खा. भाऊसाहेब वाकचौरे व खा. निलेश लंके यांना देताना कर्मचारी उदय देशपांडे, विजय गायकवाड, गोरक्षनाथ काळे, विनायक आडेप, डॉ. आशिष इरमल, संतोष तिळवले, संजय पालवे, शुभदा टेपाळे आदी.

नगर – राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमित शासन सेवेत समायोजनात होत असलेल्या विलंबाबाबत व कर्मचारी यांच्या वेतन वाढ यासह विविध मागण्यांचे निवेदन खा. भाऊसाहेब वाकचौरे व खा. निलेश लंके या अहिल्यानगर जिल्ह्यातील दोन्ही खासदारांना आरोग्य अभियान कर्मचाऱ्यांनी दिले आहे.

या निवेदनात म्हंटले आहे की, १४ मार्च २०२४ च्या शासन निर्णया नुसार १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समायोजन करण्याबाबत सव्वा वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊन गेला आहे तरी त्याची अंमलबजावणी झालेली नाही. राज्यपालांनी महाराष्ट्र राज्य विधिमंडळ २०२५ या वर्षाच्या पहिल्या अधिवेशनात मुद्दा क्रमांक ५२ नुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचे निर्णय घेतला आहे. त्यानुसार त्यांना आरोग्य सेवेतील मान्यता व प्राप्त सर्व कक्ष पदावर सामावून घेण्यात येईल असे सांगण्यात आले होते. परंतु अभिभाषणामधील या निर्णयाच्या अंमलबजावणी पूर्ण झालेली नाही. एन एच एम कर्मचारी यांना दहा टक्के मानधन व रॉयल्टी बोनस लागू करावा, ग्रॅज्युटी तसेच ज्या कर्मचाऱ्यांचे मानधन १५५०० पेक्षा जास्त आहे अशा कर्मचाऱ्यांनाही ईपीएफ ची योजना लागू करण्यात यावी. अधिकारी व कर्मचारी यांना कर्तव्य बजावत असताना अपघाती मृत्यू झाल्यास ५० लाख रुपये सानुग्रह अनुदान लागु करावे तसेच कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास २५ लाख सानुग्रह अनुदान मिळावे. अपघात झाल्यास दोन ते पाच लाख औषध उपचारासाठी सानु ग्रह अनुदान मिळावे. ज्या पद्धतीने अंगणवाडीतील कर्मचारी यांना गट विमा लागू करण्यात आला आहे. त्या धर्तीनुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी कर्मचारी व कर्मचारी यांनाही गट विमा विमा लागू करण्यात यावा. सन २०१६ –१७ वर्षापासून अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनात २५ टक्के वाढ करण्यात. समुदाय आरोग्य अधिकारी यांची रुपये २५००० मानधन व पी बी आय रुपये १५००० हे वेगळे न करता एकत्रित रुपये ४० हजार मानधन अदा करावे. समुदाय आरोग्य अधिकारी यांचे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार दहा वर्षाची अट शिथिल करून समायोजन धोरण लागू करावे. विभागनिहाय रिक्त जागा अधिकृतपणे जाहीर कराव्यात, ग्रामविकास विभाग डीएमईआर नगर विकास आरोग्य विभाग या विभागांच्या पदभरती जाहिरात प्रसिद्ध करणे पूर्वी १४ मार्च २०२४ शासन निर्णय प्रमाणे कर्मचारी व अधिकारी यांचे समायोजन करण्यात यावे. १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांचे वार्षिक मूल्यमापन अहवाल व त्या आधारे पुनर्नियुक्ती प्रक्रिया बंद करावी. इत्यादी मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

# पारधी समाजापर्यंत शासनाच्या योजनांचा थेट लाभ पोहोचवा

### ॲड. गोरक्ष लोखंडे यांचे निर्देश



अनुसूचित जाती आणि जमातींसाठी केंद्र तसेच राज्य शासन अनेक योजनांसंबंधीच्या बैठकीत बोलताना महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे. समवेत समितीचे पदाधिकारी.

नगर – पारधी समाज व वंचित घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने विविध कल्याणकारी योजना राबवल्या आहेत. मात्र अनेकदा या योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे त्यांच्या विकासाची गती मंदावते. पारधी समाज तसेच वंचित घटकांपर्यंत योजनांचा थेट लाभ पोहोचविण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, तहसीलदार शरद घोरपडे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पारधी समाजाला समान संधी देणे गरजेचे आहे. त्यांचा सर्वांगीण विकास साधावा. आत्मनिर्भर होण्यासाठी त्यांना सक्षम करावे. यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने कार्यवाही करावी. समाजातील युवकांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगार मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

अनुसूचित जाती आणि जमातींसाठी केंद्र तसेच राज्य शासन अनेक योजना राबवत आहे. मात्र लाभार्थ्यांना या योजनांची माहिती नसल्याने त्यांना लाभ मिळत नाही. या योजनांचा प्रचार व प्रसार करावा. रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या दृष्टीने विविध कर्ज योजनांचा लाभ मिळवून द्यावा. अन्याय होणार नाही, याची काळजी घ्यावी. आदिवासी वस्त्यांना आवश्यक सोयीसुविधा द्याव्यात. वीज, पाणी, रस्ते यासह सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध कराव्यात. अशा सूचनाही ॲड. लोखंडे यांनी दिल्या.



रणसंग्राम प्रतिष्ठान व पै. वैभव वाघ मित्र मंडळाच्यावतीने आनंदऋषीजी ब्लड सेंटरमध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.



अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय परिक्षेत यश संपादन करणाऱ्या नृत्यदर्पण नृत्य अकादमीच्या मुली.

## नृत्यदर्पण नृत्य अकादमीचे अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय परिक्षेत यश

नगर – सौ. अपर्णा रोहित थत्ते संचलित नृत्यदर्पण नृत्य अकादमीतील एकुण ५८ मुली गांधर्व महाविद्यालयाच्या अंतर्गत होणाऱ्या भरतनाट्यम् या शास्त्रीय नृत्यशैलीत उत्तम गुण मिळवून यश संपादीत केले.

यात मध्यमा पूर्ण परिक्षेत वेदश्री देशमुख, आदिती खटावकर, श्रावणी धनेश्वर तर विशारद प्रथम या परिक्षेत मैत्रेयी भावे व ऐश्वर्या मांडके या दोघींनी यश संपादन केले.

यासाठी त्यांना सौ. अपर्णा रोहित थत्ते यांचे मागदर्शन मिळाले. नृत्यदर्पण नृत्य अकादमीच्या शीतल देशमुख तसेच सुजाता कुलकर्णी, अश्विनी भावे तसेच सर्व विद्यार्थिनी व पालकांचे अभिनंदन होत आहे.

# अनाहत संगीत अकॅडमीचे संगीत परीक्षेत यश

### सुपर्ण प्रताप याने संपादन केली तबला विशारद पदवी



अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने एप्रिल – मे २०२५ या सत्रात घेण्यात आलेल्या संगीत परीक्षा तबला, गायन व हार्मोनियम या विषयात अनाहत संगीत अकॅडमीचे विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये प्रथम श्रेणीसह विशेष योग्यतेमध्ये उत्तीर्ण झाले.

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने एप्रिल – मे २०२५ या सत्रात घेण्यात आलेल्या संगीत परीक्षा तबला, गायन व हार्मोनियम या विषयात अनाहत संगीत अक्॑डमीचे विद्यार्थी विविध परीक्षामध्ये प्रथम श्रेणीसह विशेष योग्यतेमध्ये उत्तीर्ण झाले आणि १००% निकालाची परंपरा कायम ठेवली.

अकॅडमी पहिला विद्यार्थी चि. सुपर्ण प्रताप याने तबला विशारद ही पदवी प्रथम श्रेणी मध्ये विशेष प्रविण्यसह संपादित केली तर चि. शौनक कुलकर्णी हा विद्यार्थी मध्यमा पूर्ण परीक्षेत केंद्रात प्रथम आला आहे.

परीक्षा निहाय निकाल खालील प्रमाणे – प्रारंभिक (तबला, गायन, हार्मोनियम), तन्वी देशपांडे, पद्मनाभ जोशी, श्रीतेज ससे, वेदांत ससे, गौरव ससे, आयुष सूर्यपुजारी, भावेश जोशी, प्रतिभा जोशी, सौ.लता औटी, सौ. मीरा काळे, अर्णवी पावसे, उर्मिला द्रविड, सौ. शैला औटी, संचिता संसारे, नक्षत्रा देशपांडे (सर्व प्रथम श्रेणी व विशेष योग्यता)

प्रवेशिका प्रथम तबला सोहम जाधव, आर्जव पटणी, श्रीरंग तोंडे, साईराज मुरकुटे (सर्व प्रथम श्रेणी व विशेष योग्यता)., प्रवेशिका पूर्ण तबला शार्दूल खोल्लम व आकृती असनीकर (सर्व प्रथम श्रेणी व विशेष योग्यता)

मध्यमा प्रथम तबला संकेत भणगे, पूर्वेश भणगे, आयुष बोंदार्डे (सर्व प्रथम व द्वितीय श्रेणी)., मध्यमा पूर्ण तबला शौनक कुलकर्णी (प्रथम श्रेणी सह केंद्रात प्रथम)., विशारद पूर्ण तबला सुपर्ण प्रताप (प्रथम श्रेणी सह केंद्रात प्रथम)

विद्यार्थ्यांना अक्॑डमीचे संचालक प्रसाद सुवर्णपाठकी व सौ. श्रेया सुवर्णपाठकी यांचे मार्गदर्शन लाभले.

# लक्ष्मीआई जत्रेनिमित्त रक्तदान शिबीर उत्साहात



लक्ष्मीआई जत्रेनिमित्त अखंड गवळी समाज, अहिल्यानगर यांच्यावतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – लक्ष्मीआई जत्रेनिमित्त अखंड गवळी समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने १३ जुलैला लक्ष्मीआई मंदिर, सिव्हिल हॉस्पिटल समोर, गवळीवाडा, नगर येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. यात युवक, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांनीही सहभाग घेतला. अनेकांनी पहिल्यांदाच रक्तदान करून, हा एक अध्यात्मिक व सामाजिक सेवा उपक्रम असल्याचे समाधान व्यक्त केले.

या शिबिरासाठी जनकल्याण रक्तपेढी, नालेगाव, अहमदनगर यांचे सहकार्य लाभले. शिबिरासाठी आवश्यक असणारी मंडप, खुर्च्या, व्यवस्था उत्तम प्रकारे करण्यात आली होती. रक्तदात्यांना छत्री भेट देण्यात आल्या.

झी मराठीवरील कलाकार प्रदीप वाळके यांनीही शिबिरात उपस्थित राहून रक्तदान केले. तसेच वर्चस्व ग्रुपचे संस्थापक सागर मुर्तडकर यांनीही उपक्रमाला भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

रक्तपेढीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, सर्व वयोगटातील रक्तदाते योग्य प्रकृतीचे असून, अशा शिबिरांमुळे गरजू रुग्णांना वेळेवर रक्त मिळते. रक्तदानानंतर प्रत्येक रक्तदात्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे व अभिमानाचे भाव दिसत होते.

शिबिराच्या यशस्वितेसाठी अखंड गवळी समाजातील तरुण कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले, तसेच गावातील नागरिकांनीही मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले. या उपक्रमामुळे समाजामध्ये रक्तदानाविषयी जागरूकता वाढत असून, पुढील काळातही असेच शिबीर आयोजित करणार असल्याचे समाजाच्या वतीने सांगण्यात आले.



### जगद्गुरु संत तुकाराम महाराज शौर्य गौरव पुरस्काराने सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते सन्मानित

जगद्गुरु संत तुकाराम महाराज शौर्य गौरव पुरस्काराने सपोनि. प्रल्हाद गीते यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी नाना डोंगरे, पोलीस हेड कॉन्स्टेबल खंडेराव शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ वडणे, संजय सावंत, रमेश शिंदे, अन्सार शेख, महिला पोलीस नाईक धनवडे, मनिषा काळे, रजनी ताठे, संदिप डोंगरे आदी उपस्थित होते.

